मकरसंक्रांती निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा..! –संपादक

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक





बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२५७ बुधवार दि.१४ जानेवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### ‘अकोट पॅटर्न’ हाच भाजपचा जनमताचा आदर –दानवे

छ. संभाजीनगर : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने भाजप व एमआयएमच्या अकोट येथील युतीवर खोचक शब्दांत निशाणा साधला आहे. वरवर एकमेकांवर तुटून पडण्याचे नाटक करायचे व आतून मात्र सत्तेसाठी अकोट पॅटर्न राबवायचा हा भाजपच्या लेखी जनमताचा आदरच ठरतो, असे ठाकरे गटाचे आमदार तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपवर खोचक टीका करत म्हटले आहे. हिंदुत्वाचे राजकारण करणाऱ्या भाजपला विरोधकांच्या प्रचंड टीकेला सामोरे जावे लागत आहे. भाजपने अकोटच्या सर्वांगीण विकासासाठी एमआयएम व इतर पक्षांना सोबत घेऊन अकोट विकास मंच स्थापन केला. यावरून ठाकरे गटाने भाजपवर टीकेची झोड उठली आहे.

### कालावधी संपल्यानंतरही प्रचार करण्याची मुभा

मुंबईः राज्यातील २९ महापालिकांसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी पार पडणार आहे. मतदानासाठी अवघे काही तास शिल्लक असताना मुंबई निवडणूक विभागाने एक महत्त्वाचा आणि वादग्रस्त निर्णय घेतला आहे. प्रचाराचा अधिकृत कालावधी संपल्यानंतरही उमेदवारांना घरोघर प्रचार करण्याची मुभा देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य आणि चर्चांना उधाण आले आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचाराचा कालावधी १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे. मात्र, याच दरम्यान राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांना १५ जानेवारीपर्यंत घरोघरी जाऊन प्रचार करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे प्रचाराची अधिकृत वेळ संपल्यानंतरही प्रत्यक्ष प्रचार सुरू राहणार आहे.

# अर्थसंकल्पात शेतीसाठी भरीव तरतूद करा!

## कृषिमंत्री चौहान यांनी घेतली अर्थमंत्री सीतारामन यांची भेट; कृषी आणि ग्रामीण विकासासाठी सूचना

दिल्ली । वृतसंस्था

**केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यात मंगळवारी (दि.१३) बैठक झाली. या बैठकीत शेती आणि ग्रामीण भागाच्या विकासावर चर्चा करण्यात आली. यावेळी अर्थसंकल्पात शेतीसाठी भरीव तरतूद करण्यात यावी याबाबत चर्चा झाली असल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिली.**



कृषिमंत्री शिवराजसिंग म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार ग्रामीण भारताला स्वावलंबी आणि समृद्ध करण्यासाठी सतत काम करत आहे. पंतप्रधानांच्या सक्षम आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली, आगामी सर्वसाधारण अर्थसंकल्प शेतकरी आणि ग्रामीण समाजासाठी प्रेरणादायी असेल. २०२६–२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प पंतप्रधानांच्या समृद्ध शेतकरी, मजबूत गावे या संकल्पाला साकार करण्यासाठी एक मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अलीकडेच कृषिमंत्री चौहान यांनी देशभरातील विविध राज्यांना भेट दिली आहे. तसेच राज्यांमध्ये प्रगतीशील शेतकरी, कृषी तज्ञ, बचत गट, सहकारी संस्था, ग्रामीण उद्योग आणि दोन्ही मंत्रालयांशी संबंधित ▶▶ पान २ वर

# जिप.पंस.निवडणुकांचे बिगुल वाजले!

## ५ ला मतदान, ७ फेब्रुवारीला निकाल, पहिल्या टप्प्यात १२ जिप

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील बहुप्रतीक्षित जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची घोषणा मंगळवारी (दि.१३) राज्य निवडणूक आयोगाने केली. राज्यातील १२ जिल्हा परिषदांसह १२५ पंचायत समितींसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. १ जुलै २०२५ ची मतदार यादी ग्राह्य धरली जाणार असल्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि सचिव सुरेश**



**काकाणी यांनी स्पष्ट केले.**

निवडणुकांची घोषणा होताच निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आता महापालिका निवडणुका संपताच पुणे, कोल्हापूर,सांगली, सोलापूर, सातारा, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, परभणी, धाराशिव, ▶▶ पान २ वर

### या जिल्हा परिषदांची निवडणूक होणार

कोकण विभाग : रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे विभाग : सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, मराठवाडा विभाग : छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर.

# दोन्ही राष्ट्रवादीचे विलिनीकरण होणार नाही

## अजित पवारांनी स्पष्ट सांगून चर्चेला दिला पुर्णविराम

पुणे । पतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यानंतर त्यांचे विलिनीकरण होणार असल्याचे संकेत अनेकांनी दिले होते. आता त्यावर अजित पवारांनी भाष्य केले आहे. दोन्ही राष्ट्रवादींचे विलिनीकरण होणार नाही आणि सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होणार नाहीत असे अजित पवारांनी स्पष्ट केले. ते पुण्यामध्ये बोलत होते.

सुप्रिया सुळेंचा राष्ट्रवादी पक्ष हा इंडिया आघाडीचा भाग आहे, त्यामुळे त्या केंद्रात मंत्री होणार नाहीत, असे अजित पवार म्हणाले. तसेच



दोन्ही राष्ट्रवादींचे विलिनीकरण होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. निवडणुकीत नंतर वेळ पडली तर पुण्यात भाजपसोबत जाणार का हा प्रश्न अनेकदा विचारुन देखील अजित पवारांनी त्यावर स्पष्ट उत्तर दिले नाही. अजित पवारांनी मैत्रीपूर्ण लढतीचे आश्वासन दिले ▶▶ पान २ वर

# आता भारतीय हवाई दलात ‘अग्निवीरवायू’ भरती

नवी दिल्ली । प्रतिनिधी

अग्निवीर भरतीची तयारी करणाऱ्या तरुण–तरुणींसाठी महत्त्वाची बातमी असून इंडियन एअर फोर्सने अग्निवीरवायु भरती २०२७ साठी अधिकृत अधिसूचना जाहीर केली आहे. अर्ज प्रक्रियाही सुरू करण्यात आली असून,पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागवण्यात येत आहेत.

देशसेवेची इच्छा असलेल्या तरुणांसाठी अग्निवीरवायु २०२७ ही भारतीय हवाई दलात प्रवेशाची सुवर्णसंधी आहे. पात्र उमेदवारांनी अंतिम तारखेपूर्वी अर्ज करून निवड प्रक्रियेसाठी तयारी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. भारतीय हवाई दलाने १२ जानेवारी रोजी अग्निवीरवायु २०२७ भरतीची अधिसूचना प्रसिद्ध केली. इच्छुक उमेदवारांनी https://iafrecruitment.edcil.co.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करायचा आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख १ फेब्रुवारी २०२६ आहे. भरतीची निवड प्रक्रिया ही ऑनलाईन लेखी परीक्षा, कागदपत्र पडताळणी, शारीरिक चाचणी, पुरुष : १.६ किमी धावणे ▶▶ पान २ वर










# बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांची होणार चौकशी !

## संबंधीत मनपा आयुक्त देणार अहवाल, निवडणूक आयुक्तांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांबाबत राज्य निवडणूक आयोगाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांनी मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत यावर मोठे भाष्य केले. ज्या ठिकाणी बिनविरोध निवडी झालेल्या आहेत, तेथील अहवाल मागवले असून चार गोष्टी तपासल्या जाणार असल्याची माहिती आयोगाच्या आयुक्तांनी दिली.

राज्यात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. महापालिका



निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारी रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. महापालिकांसाठी प्रचाराचा मंगळवारी (१३ जानेवारी) शेवटचा दिवस होता. मात्र, या महापालिका निवडणुकीत राज्यभरात जवळपास ▶▶ पान २ वर

# आई-वडिलांचा सांभाळ न केल्यास पगारातून १०% कपात

हैदराबाद । वृतसंस्था

वृद्ध माता-पित्यांची हेळसांड करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना तेलंगणा सरकारने मोठा दणका दिला आहे. मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी घोषणा केली की, जे कर्मचारी आपल्या आई–वडिलांचा सांभाळ करणार नाहीत, त्यांच्या वेतनातून १० टक्के कपात केली जाईल. ही कापलेली रक्कम थेट पीडित पालकांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. या योजनेसाठी सरकारने ५० कोटींची तरतूद केली असून, ज्येष्ठांसाठी ‘प्रणाम’ नावाचे डे–केअर सेंटरही उभारले जाणार आहे. याशिवाय, आगामी महापालिका निवडणुकांमध्ये ट्रान्सजेंडर व्यक्तींना सह–सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याचा ऐतिहासिक निर्णयही त्यांनी घेतला आहे. तसेच दिव्यांगांना मोफत उपकरणे आणि नवविवाहित दिव्यांग जोडप्यांना २ लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा करत, २०२६–२७ च्या अर्थसंकल्पात नवीन आरोग्य धोरण आणण्याचे संकेतही मुख्यमंत्र्यांनी दिले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १६.०० क्विंटल | २,३९० | ३,२५१ | २,६३३ |
| ज्वारी/हायब्रिड : ३४.०० क्विंटल | २,००१ | ३,६६० | २,९०९ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८७.०० क्विंटल | ६,३०० | ७,२२० | ६,८५२ |
| उडीद :७.५० क्विंटल | ४,४०० | ६,००० | ५,२०० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,४५० | ३,११० | २,८४७ |
| मुग: १३.५० क्विंटल | ६,४१० | ७,७०२ | ६,९८७ |
| सोयाबीन: २७.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,००० | ५,१५१ | ४,७७० |




अग्रलेख


# आश्वासन देणारे अन् ऐकणारे दोघेही बेफिकीरच

पक्ष आणि नेते राज्याच्या पर्यायाने समाजाचा विकास करतील याचे स्वप्न मतदार प्रत्येक निवडणुकीत बघतात. त्यांच्याच मतांवर निवडून आलेले सरकार जनकल्याणकारी काम करेल अशी आशा बघतात. त्यासाठी आलटून पालटून सर्व पक्षांकडे सत्ता सोपवतात. पण दर निवडणुकीनंतर नेते आणि त्यांचे पक्ष लोकांचा पुढच्या पाच वर्षांसाठी 'गणपत वाणी' करतात. याही वेळी यापेक्षा वेगळे काही घडणार नाही; कारण याआधी ते घडलेले आहे. पक्षही तेच आणि त्यांचे नेतेही तेच. निवडणुकीच्या स्वरूपानुसार आश्वासने थोडीफार बदलतात इतकेच.

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांच्या निमित्ताने आश्वासनांचा पाऊस पडत आहे. हा जोर इतका आहे की, कदाचित तो खऱ्याखुऱ्या पावसाची सरासरी देखील ओलांडू शकेल. कारण प्रत्यक्ष मतदानाला अजून एक दिवस बाकी आहे. या निवडणुकीत पक्ष आणि मतदार यापैकी नेमका कोणी कोणाचा 'गणपत वाणी' करायचे ठरवले असावे? खरे तर नेते आणि पक्ष कसले गणपत वाणी? मतदारच खरे तर गणपत वाणीचे प्रतिनिधी. बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेतील, 'गणपत वाणी बिडी पिताना, लावायचा नुसतीच काडी; म्हणायचा अन् मनाशीच की, या जागेवर बांधीन माडी.' पण माडी बांधायचे फक्त स्वप्नरंजनच ठरते. फक्त स्वप्न बघता बघता गणपत वाण्याची काय गत होते त्याचे वर्णन म्हणजे ही कविता. दरवेळच्या आश्वासनांमध्ये राज्याचा, परिसराचा विकास तर असतोच. यावेळी त्यात थोडी भर पडली असू शकेल. हुशार मुलींना मोफत स्कूटी, नवीन प्रसूतिगृह, भयमुक्त परिसर, प्रवासात महिलांना सूट, मोफत मेट्रो सेवा अशा बऱ्याच सोयीसुविधा सगळेच पक्ष देणार आहेत. राज्याराज्यातील राजकीय पक्षांच्या कथनानुसार ते पक्ष वर्षानुवर्षे विकासाचे राजकारण करतात, तरीही आनंदाच्या निर्देशांकात देश नेहमीच पिछाडीवर कसा? हा प्रश्न नेत्यांना कधीच सतावत नसेल का? गतवर्षी १४३ देशांच्या यादीत भारताचा १२६ वा क्रमांक होता. म्हणजेच वर्षानुवर्षे विकास फक्त कागदावर घडतो. लोकांना तीच तीच आश्वासने देताना नेत्यांना काहीच वाटत नसेल का? सामान्य माणूस आत्यंतिक गरजेच्या वेळी एखाद्याकडून हातउसने पैसे घेतो. ते वेळेवर देता आले नाही तर त्या व्यक्तीला तोंड दाखवायची त्याला लाज वाटते. इथे आश्वासनांची पूर्ती न करताही मतदारांना मतांसाठी थेट पाच वर्षांनी तोंड दाखवणे हा नेते त्यांचा हक्कच मानतात. त्याच त्याच आश्वासनांच्या पोतडीवर मत मागायला लोकांपुढे जातात. मतदारही प्रामाणिकपणे मतदान करतात आणि दुसऱ्या दिवशी त्यांच्या कामाला लागतात. कारण त्यांच्या हाती काहीच पडणार नाही याची खात्रीच पटलेली असते. याही वर्षी विकासाचीच आश्वासने पक्ष देणार असतील तर मागची अनेक वर्षे पक्षांनी नेमका कोणाचा विकास घडवून आणला? निवडणुकीतील जाहीरनाम्यांचे पुढे काय होते? त्यातील किती आश्वासनांची पूर्तता केली जाते? लोकांना वेड्यात काढायचा हक्क त्यांना कोणी दिला? असे प्रश्न त्यांना विचारले जायला हवेत. पण सामान्य माणसे तरी काय करतील, दिवसभर काबाडकष्ट करणेच त्यांच्या नशिबी असते. एवढे करूनही फक्त दोन वेळच्या पोटापाण्याची सोय करता करताच त्यांची पाच वर्षे निघून जातात. मग ते नेत्यांना प्रश्न कधी विचारणार? गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना असे प्रश्न विचारण्याची हिंमत कुठून गोळा करणार? परिणामी, लोकशाहीत लोकांची स्मरणशक्ती क्षीण असते असा गैरसमज पाळून नेते पुन्हा एकदा त्यांना सामोरे जातात. कारण निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणे त्यांच्या अंगवळणी पडलेले असते. म्हणूनच कदाचित सरन्यायाधीश जे. एस. खेहर यांनी जाहीरनाम्यांची संभावना कागदी तुकडे अशी केली होती. राजकीय पक्षांना त्यांच्या जाहीरनाम्याला उत्तरदायी ठरवावे असेही ते म्हणाले होते. त्यांचे मत स्वागतार्हच आहे; पण मांजराच्या गळ्यात ही घंटा बांधायची कोणी हा खरा प्रश्न आहे. तेव्हा, याहीवर्षी आश्वासनांची गाजरेच दाखवली जातील यात शंका घेण्याचे काहीच कारण नाही. महाराष्ट्रात फक्त निवडणूक केंद्रीभूत विकासाची स्वप्ने पाहाणारे नेते आहेत आणि महिनाभर त्या पावसात भिजूनही मतदार कोरडेच राहतील हे स्पष्ट आहे.

# विकासपुरुष नेतृत्व मा.आ.प्रकाशदादा सोळंके

दि. १४ जानेवारी हा आमचे प्रेरणास्थान व आधारस्तंभ, विकासपुरुष मा. आमदार श्री. प्रकाशदादा सोळंके यांचा वाढदिवस आहे. या मंगलदिनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!



मा. प्रकाशदादा यांचा जन्म प्रगत व सधन कुटुंबात, आदरणीय कै. सुंदरराव सोळंके साहेब यांच्या पोटी झाला. दादांबद्दल लिहिणे हे माझे सौभाग्य आहे, कारण लहानपणापासून मला त्यांच्या सहवासात राहण्याची संधी लाभली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, कार्यशैलीचा आणि सेवाभावाचा मी अगदी जवळून साक्षीदार आहे.दादांचा राजकीय व सामाजिक प्रवास हा केवळ विकासासाठी आणि सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी समर्पित राहिला आहे. माजलगाव, धारूर व वडवणी या भागांतील त्यांच्या भरीव विकासकामांमुळे संपूर्ण परिसराचा चेहरामोहरा बदलत आहे. कुंडलिक प्रकल्प, उपसा सिंचन योजनांमुळे माळरानावरही ऊसासारखी नगदी पिके डोलू लागली असून शेतकरी समृद्ध होत आहे. दादांच्या दूरदृष्टीला सौ. वहिनीसाहेब यांच्या कार्याची मजबूत साथ लाभली असून या भागात शिक्षणाची गंगा वाहत आहे. शिक्षण हेच विकासाचे खरे पायाभूत साधन आहे या विचारातून त्यांनी सिंदफणा इंग्लिश स्कूल, जिजामाता नर्सिंग कॉलेज, फिजिओथेरपी कॉलेज यांसारख्या शिक्षणसंस्था सुरू केल्या. यामुळे ग्रामीण भागातील तरुण पिढीस गुणवत्तापूर्ण शिक्षण व कायमस्वरूपी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. मोहखेड येथे सुरू झालेली दर्जेदार शाळा ही त्याच दूरदृष्टीची साक्ष आहे. दादांनी सुरुवातीपासूनच गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सर्वांना सोबत घेऊन विकास साधायचा हा त्यांचा ठाम निर्धार आहे. रोजगारनिर्मितीसाठी माजलगाव येथे उभारण्यात आली. रस्ते, वीज, आरोग्यसेवा या मूलभूत सुविधांचा झपाट्याने विकास होत आहे. सदोला रोडवरील सुसज्ज ग्रामीण रुग्णालय, स्टेडियम, पोलीस स्टेशन आणि नवीन बसस्थानक या भव्य इमारती दादांच्या विकासकार्याची जिवंत साक्ष देत उभ्या आहेत. आज त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली तिन्ही तालुक्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. इतकी दूरदृष्टी आणि लोकहिताची तळमळ आज क्वचितच कुणाकडे आढळते. दादा आमच्यासाठी केवळ नेते नाहीत, तर दैवत आहेत. दादांबद्दल कितीही लिहिले तरी शब्द अपुरेच ठरतील. माझ्यावर आदरणीय दादा व वहिनी यांनी कुटुंबातील सदस्याप्रमाणे प्रेम, आपुलकी व माया केली आहे. त्यांच्या छायेत माझे जीवन सुरक्षित व समाधानी आहे. त्यांच्या मायाळूपणाचे अनेक अनुभव माझ्या आयुष्यात आहेत. एकदा मी आजारी असताना, आपल्या व्यस्त वेळापत्रकातूनही दादांनी माझी मुलाप्रमाणे काळजी घेतली. मला कायमस्वरूपी नोकरी देऊन माझ्यासारख्या सामान्य माणसाला आधार दिला यासाठी मी सदैव ऋणी आहे. दादा, वहिनी आणि संपूर्ण सोळंके परिवाराने माझ्यावर दाखवलेला विश्वास आणि प्रेम हे माझ्या जीवनातील अमूल्य भांडार आहे. पुढील जन्मीही मला त्यांच्या सहवासात सेवा करण्याची संधी देवाने द्यावी, हीच प्रार्थना. आदरणीय मा. आमदार श्री. प्रकाशदादा सोळंके यांना वाढदिवसाच्या हार्दिक मंगलमय शुभेच्छा! त्यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि अखंड यश लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

श्री.महादेव वाघ
कानिफनाथ विद्यालय, मोहखेड.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ काल, आज आणि उद्या

**मराठवाड्याच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासात काही घटना अशा असतात ज्या केवळ एका काळापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या संपूर्ण पिढ्यांच्या आयुष्यावर परिणाम घडवतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार हा असाच एक निर्णायक क्षण आहे. नामविस्तार दिन म्हणजे फक्त एका संस्थेच्या नावात झालेला बदल नाही; तो मराठवाड्याच्या आत्मसन्मानाचा, शिक्षणाच्या नव्या दिशेचा आणि समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेचा उत्सव आहे.**

मराठवाडा प्रदेश निजामशाहीच्या काळात शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत मागास राहिला होता. स्वातंत्र्यानंतर या भागाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र विद्यापीठाची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. त्यातूनच २३ ऑगस्ट १९५८ रोजी औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. सुरुवातीला अवघी नऊ महाविद्यालये आणि सुमारे तीन हजार विद्यार्थी इतकाच या विद्यापीठाचा व्याप होता. तरीही त्या दिवसापासून मराठवाड्याच्या तरुणाईला उच्च शिक्षणाची नवी दिशा मिळू लागली. पुढील काही दशकांत मराठवाड्यात सामाजिक जागृती वाढू लागली. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी शिक्षण, समता, सामाजिक न्याय आणि आत्मसन्मान या मूल्यांना नवसंजीवनी दिली. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, ही जाणीव समाजात रुजू लागली. या वैचारिक पार्श्वभूमीवर १९७४ पासून नामांतर आंदोलन सुरू झाले. हा संघर्ष केवळ एका संस्थेच्या नावासाठी नव्हता, तर मराठवाड्यातील वंचित घटकांच्या ओळखीचा, सन्मानाचा आणि भविष्यातील वाटचालीचा प्रश्न होता. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी शासनाने विद्यापीठाचे नाव अधिकृतपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे घोषित केले. हा निर्णय मराठवाड्याच्या सामाजिक इतिहासातील एक मैलाचा दगड ठरला. या दरम्यानचा १९७८ ते १९९४ हा काळ संक्रमणाचा होता. कागदोपत्री नाव जुने होते, पण समाजमनात नाव आधीच बदलले होते. त्या काळात शिक्षण घेतलेले असंख्य विद्यार्थी मनाने आधीच बाबासाहेबांच्या नावाच्या विद्यापीठाचे विद्यार्थी झाले होते. या संक्रमणकाळातील अनुभव मी स्वतः अनुभवले आहेत. अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालयातून १९८९ साली बी.कॉम. पूर्ण करताना मी प्रत्यक्ष विद्यापीठ कधी पाहिलेच नव्हते. त्या काळात वाहतूक, आर्थिक परिस्थिती आणि घरच्या जबाबदाऱ्यांमुळे अनेक विद्यार्थ्यांना विद्यापीठात जाणे शक्य नव्हते. तरीही मनात आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाच्या विद्यापीठाचे विद्यार्थी आहोत, ही भावना दृढ होती. नामविस्ताराची अंतिम अंमलबजावणी झाल्यानंतर मी अधिकृतपणे आपली पदवी बदलून घेतली आणि नव्या प्रमाणपत्रावर बाबासाहेबांचे नाव पाहताना मला केवळ शैक्षणिक समाधान नव्हे, तर सामाजिक आत्मसन्मानाची जाणीवही झाली. नामविस्तारानंतर विद्यापीठाचा विकास वेगाने घडू लागला. आज सुमारे सातशे पन्नास एकर परिसरात वसलेले हे विद्यापीठ मराठवाड्याचे प्रमुख ज्ञानकेंद्र बनले आहे. चारशेहून अधिक संलग्न महाविद्यालये, साडेतीन लाखांहून अधिक विद्यार्थी, चव्वेचाळीस शैक्षणिक विभाग, औरंगाबाद मुख्य परिसर, उस्मानाबाद उपपरिसर आणि रत्नागिरी येथील सागरी जैवविविधता केंद्र अशी व्यापक रचना उभी राहिली आहे. विद्यापीठाला 'अ' दर्जाचे नॅक मानांकन प्राप्त झाले असून गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधला जात आहे. विद्यापीठातील विविध अभ्यासक्रम, संशोधन केंद्रे, अध्यासन केंद्रे, डिजिटल स्टुडिओ, नॉलेज रिसोर्स सेंटर, कमवा व शिका योजना, प्री-आयएएस कोचिंग, गोल्डन ज्युबली फेलोशिप, दुष्काळी परिस्थितीत वसतिगृह शुल्क माफी यांसारख्या उपक्रमांमुळे हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडले आहे. विद्यापीठ आता केवळ परीक्षा घेणारी संस्था न राहता व्यक्तिमत्त्व घडवणारी सामाजिक संस्था बनली आहे. आजचा मराठवाडा पूर्वीपेक्षा आत्मविश्वासाने उभा आहे. शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. पूर्वी विद्यार्थी केवळ आपले महाविद्यालय सांगायचा; आज तो अभिमानाने विद्यापीठाचे नाव सांगतो. हा बदल केवळ शैक्षणिक नाही, तर मानसिक आणि सामाजिक पातळीवर घडलेला आहे. उद्याचा विचार केला तर विद्यापीठ जागतिक दर्जाच्या संशोधनाकडे वाटचाल करत आहे. आयसीटी आधारित शिक्षण, उद्योग-विद्यापीठ सहकार्य, आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्प, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीतून निधी उभारणी, युनिव्हर्सिटी फॉर सोसायटी आणि युनिव्हर्सिटी विथ आयसीटी या संकल्पनांद्वारे विद्यापीठ आपली ओळख अधिक व्यापक आणि समृद्ध करत आहे. ध्येय एकच आहे सामाजिकदृष्ट्या जागरूक, संशोधनक्षम, सक्षम आणि जबाबदार नागरिक घडवणे. नामविस्तार दिन म्हणूनच केवळ भूतकाळाची आठवण नाही, तर वर्तमानाचा पाया आणि भविष्याचा मार्ग आहे. या दिवसामुळे मराठवाड्याला केवळ नवे नाव मिळाले नाही, तर नवी ओळख, नवी दिशा आणि नवे स्वप्न मिळाले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची जी मशाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पेटवली, ती आजही या विद्यापीठाच्या प्रत्येक पावलात उजळत आहे. आणि हीच या नामविस्तार दिनाची खरी अर्थवत्ता आहे.



प्राचार्य डॉ.भारत कऱ्हाड
वराडकर बेलोसे महाविद्यालय, दापोली

# जिल्ह्यासाठी स्थानिक सुट्ट्या जाहीर

**जालना । प्रतिनिधी**

धार्मिक सण उत्सवानिमित्त जिल्ह्यातील तीन सार्वजनिक सुट्ट्या जिल्हाधिकारी यांना जाहिर करण्याचे अधिकार आहेत. त्यानूसार जालना जिल्ह्यासाठी शुक्रवार दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी रक्षाबंधन, दिपावली सणानिमित्त सोमवार दि.९ नोव्हेंबर २०२६ आणि दि. १६ डिसेंबर २०२६ रोजी राजाबाग सवार दर्गा उत्सवानिमित्त सुट्टी देण्यात आली आहे. ही अधिसुचना जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केली आहे. स्थानिक सुट्ट्या जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषदेची कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्यालये, जिल्ह्यातील शासकीय कोषागारे, महामंडळाची कार्यालये व इतर सर्व खाजगी शैक्षणिक संस्थाना लागू राहतील. तर जालना जिल्ह्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालय तसेच केंद्र शासनाची कार्यालये आणि बँका यांना लागू होणार नाहीत. असेही अधिसुचनेत नमूद करण्यात आले आहे.

# न.परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना (उबाठा) आघाडीचा नवा अध्याय

## मा.आमदारांच्या मार्गदर्शनाखाली नितिन जेथलिया यांची संयोजकपदी निवड



**परतुर । प्रतिनिधी**

**परतूर नगर परिषदेच्या राजकारणात एक नवा आणि सकारात्मक बदल घडत असून, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना (उबाठा) आघाडीच्या नेतृत्वात नव्या संघटनात्मक रचनेची घोषणा करण्यात आली आहे. या आघाडीच्या संयोजकपदी युवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस, युवा नेतृत्वाचा चेहरा म्हणून ओळख असलेले श्री. नितिन भैय्या जेथलिया यांची निवड करण्यात आली आहे.**

ही निवड माजी आमदारांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ नेत्यांच्या विश्वासातून झाल्याने राजकीय वर्तुळात तिचे विशेष स्वागत होत आहे. संघटन कौशल्य, तरुणाईशी असलेला मजबूत संपर्क आणि जनतेच्या प्रश्नांबाबतची ठाम भूमिका यामुळे नितिन भैय्या जेथलिया हे नाव आज परतूरच्या राजकारणात आशेचे केंद्र बनले आहे. याच वेळी आघाडीच्या गटनेतेपदी श्री. गणेश भैय्या नळगे तर प्रतोदपदी श्री. बाबुरावजी हिवाळे यांची निवड करण्यात आली आहे. अनुभवी व अभ्यासू नेतृत्वाची ही त्रिसूत्री परतूर नगर परिषदेतील आघाडीला नवी ताकद देईल, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. माजी आमदारांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या या नव्या संघटनात्मक बांधणीमुळे परतूर शहराच्या विकासाला गती मिळेल, जनतेचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील आणि नगर परिषदेत सक्षम व सकारात्मक विरोधाची भूमिका आघाडी बजावेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नितिन भैय्या जेथलिया व गणेश भैय्या नळगे यांच्या निवडीमुळे युवक कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण असून, ''तरुण नेतृत्वाला संधी देणारी ही आघाडी भविष्यात परतूरच्या राजकारणाची दिशा बदलू शकते,'' अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. शहरातील विविध सामाजिक, व्यापारी व युवक संघटनांकडूनही या नव्या नेतृत्वाचे अभिनंदन होत असून, राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना (उबाठा) आघाडी माजी आमदारांच्या मार्गदर्शनाखाली परतूर नगर परिषदेतील प्रभावी राजकीय शक्ती म्हणून उभी राहत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.यावेळी आघायचे सर्व नगरसेवक व जिल्हा प्रमुख महेश नळगे, संतोष पवार, संदीप पाचरे, आदींची उपस्थिती होती.

# प्रभाग सहा मधून काँग्रेसचे सर्व उमेदवार विजय होणार-संजय मुथा

**जालना । प्रतिनिधी**

**जालना प्रभाग क्रमांक ६ मधील निवडणूक आता केवळ उमेदवारांपुरती मर्यादित राहिली नसून ती जनआंदोलनात रूपांतरित झाली आहे, असे प्रतिपादन काँग्रेस-महाविकास आघाडीचे उमेदवार संजय मुथा यांनी केले.**



उमेदवार संजय मुथा, कमलाबाई भुरेवाल, इफत सलमान खान आणि नजीब अहमद मोहम्मद यांनी प्रचाराच्या सांगता सभेत बोलताना त्यांनी गेल्या काही दिवसांतील अनुभवांचे सविस्तर विश्लेषण केले. मुथा म्हणाले की, आम्ही जेव्हा प्रभागातील प्रत्येक उंबरठा ओलांडला, तेव्हा मतदारांच्या डोळ्यांत एक वेगळाच विश्वास दिसला. व्यापाऱ्यांपासून ते हातावर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांपर्यंत प्रत्येकाने दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद ही परिवर्तनाची नांदी आहे. जालन्याची बाजारपेठ हा शहराचा आत्मा आहे. या बाजारपेठेला भयमुक्त करणे आणि तिथे सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देणे ही माझी प्राथमिकता असेल. ते पुढे म्हणाले, मी लोकांकडे कोणतीही प्रलोभने घेऊन गेलो नाही, तर केवळ कामाचा अजेंडा घेऊन गेलो. प्रचारादरम्यान गल्लीबोळात फिरताना माता-भगिनींनी आणि वडीलधाऱ्यांनी जे प्रेम दिले, त्याने मी भारावून गेलो आहे. लोकांना आता पोकळ आश्वासने नको आहेत, तर हक्काचा आणि कृती करणारा माणूस हवा आहे. जनतेने टाकलेली ही विश्वासाची धुरा मी शेवटपर्यंत प्रामाणिकपणे पेलेन, असे अभिवचन त्यांनी दिले.

# पान १ वरून...

### अर्थसंकल्पात शेतीसाठी

राष्ट्रीय स्तरावरील संस्थांच्या वरिष्ठ प्रतिनिधींशी चर्चा केली आहे. या चर्चेतील कल्पना आणि सूचना कृषी आणि ग्रामीण विकास योजनेत रूपांतरित करून अर्थमंत्र्यांना सादर केल्या आहेत, अशी माहिती मंत्रालयाने दिली आहे. केंद्रीय अर्थसंकल्प तीन आठवड्यावर आला आहे. त्यामुळे अर्थसंकल्पपूर्व घडामोडीला वेग आला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर करतील. शेती क्षेत्राला बुस्ट देण्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात येईल, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात शेती क्षेत्राचं डिजिटलीकरण करण्यासाठी विशेष तरतूद करण्यात येईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करून जमीन, पिकांच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी विशेष योजनांची घोषणा होण्याची चिन्हं आहेत. दरम्यान देशातील पायाभूत सुविधांची निर्मिती, सिंचनाखालील क्षेत्राचा विस्तार आणि कृषी संशोधन संस्थांसाठी भरीव तरतुदीची अपेक्षा आहे.

--------------

### दोन्ही राष्ट्रवादीचे विलिनीकरण

होते, पण आता ते शब्द पाळत नाहीत अशी भाजपकडून टीका केली जाते. त्यावर जेव्हा मी लढतो तेव्हा ती मैत्रीपूर्ण लढत कशी असेल? असा प्रश्न अजित पवारांनी केला. अजित पवार म्हणाले की, जे लोक आमच्या धोरणांवर टीका करताहेत त्यांना पुण्यातील सत्ता गामावण्याची भीती आहे. आज मुख्यमंत्री पुण्यात आले. ते म्हणाले की १५ तारखेनंतर महायुती अभेद्य राहील. पण ते पुढे असे म्हाणाले की, काहीजण फुकटची आश्वासने देऊन मला बाजीराव म्हणा असे म्हणताहेत. पण पहिले बाजीराव पेशवे कर्तृत्ववान होते, मनगटाच्या जोरावर त्यांनी कारभारावर केला. मुख्यमंत्री म्हणाले की, १५ तारखेला उठा अलार्म बंद करा, मतदान केंद्रावर जा आणि कमळाचे बटन दाबा. पण मी म्हणतो सकाळी लवकर उठा, अलार्म बंद करा पण मतदान केंद्रावर जाऊन घड्याळाचेच बटन दाबा, असे आवाहन अजित पवारांनी केले. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी नेते अजित पवारांनी पुण्यासह पिंपरी-चिंचवडसाठी सर्व ताकद पणाला लावलेली पाहायला मिळाली. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी अजित पवारांचा रोड शो पार पडला. नऱ्हे-आंबेगाव परिसरातील प्रभागांसाठी अजित पवारांनी प्रचार रॅली काढली. यावेळी अजित पवारांनी भाजपला जोरदार लक्ष्य केले.

--------------

### जिप.पंस.निवडणुकांचे

लातूर, छ.संभाजीनगर जिल्ह्यात निवडणुका होत आहेत. उमेदवारी अर्ज स्वीकारण्यासाठी १६ जानेवारी ते २१ जानेवारी पर्यंत मुदत देण्यात आली आहे. राज्यात सध्या ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. यामधील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ संपून काही वर्षे लोटलेले आहेत. त्यामुळे प्रशासकच या संस्थांचा कारभार हाकत आहेत. मात्र या सर्वच संस्थांच्या निवडणुका आता होणार नाहीत. ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका तात्पुरत्या स्थगित ठेवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. अशा २० जिल्हा परिषदा आणि ८८ पंचायत समित्या आहेत. कोर्टात या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी होणार आहे. त्यामुळे आता केवळ १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत. राज्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, या निवडणुकीत प्रत्येकाला दोन मतं करण्याचा अधिकार असेल. एक जिल्हा परिषदेसाठी आणि एक पंचायत समितीसाठी. अर्ज प्रक्रिया ऑफलाईन असेल. या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ ची मतदार यादी वापरण्यात येणार आहे. ३ नोव्हेंबरला ही यादी प्रसिद्ध झालेली आहे. नावांचा समावेश करणे किंवा वगळणे, हे राज्या निवडणूक आयोगाच्या कक्षेमध्ये येत नाही, असे आयुक्तांनी सांगितले. मंगळवारपासूनच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी आचारसंहिता जाहीर झालेली आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

अर्ज स्वीकारणे : १६ जानेवारी ते २१ जानेवारी, अर्जांची छाननी : २२ जानेवारी २०२६, अर्ज माघारीची अंतिम मुदत : २७ जानेवारी दुपारी ३ पर्यंत , अंतिम उमेदवार यादी व चिन्हवाटप : २७ जानेवारी दुपारी ३.३० नंतर , मतदान : ५ फेब्रुवारी सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत, मतमोजणी : ७ फेब्रुवारी सकाळी १० पासून

------------

### आता भारतीय हवाई दलात

७ मिनिटांत, महिला : १.६ किमी धावणे ८ मिनिटांत, यासोबत पुश-अप्स, सिट-अप्स, स्क्वॉट्स, ॲडॅप्टेबिलिटी टेस्ट, वैद्यकीय तपासणी आणि अंतिम गुणवत्ता यादी.अशी निवड प्रक्रिया राहणार आहे. यासाठी कमाल वयोमर्यादा २१ वर्षे आहे.

**शैक्षणिक पात्रता :**

१२ वी उत्तीर्ण, विषय : गणित, भौतिकशास्त्र आणि इंग्रजी, एकूण किमान ५०% गुण, इंग्रजी विषयात स्वतंत्रपणे ५०% गुण अनिवार्य.

**वैद्यकीय व शारीरिक निकष**

किमान उंची : १५२ सेमी, पर्वतीय व ईशान्य भारतातील महिला उमेदवारांना ५ सेमी उंची सवलत, दात, ऐकण्याची क्षमता, दृष्टी यांचे ठरावीक निकष लागू, पुरुष व महिला उमेदवारांसाठी वैद्यकीय निकष वेगवेगळे.

-----------

### बिनविरोध निवडून आलेल्या

६० पेक्षा जास्त उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. या बिनविरोध निवडीवरून विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे. यावरून विरोधकांनी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. या मुद्याबाबत पत्रकारांनी निवडणूक आयुक्तांना प्रश्न विचारला. यावर बोलताना निवडणूक आयुक्तांनी म्हटले की, ''ज्या ठिकाणी बिनविरोध निवडणूक झाली आहे, त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने आदेश देत संबंधित महापालिकेच्या आयुक्तांकडून अहवाल मागवले आहेत. हा अहवाल आल्यानंतर चार काही बाबी तपासल्या जाणार आहेत. एक म्हणजे जो उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. त्या उमेदवाराने इतर उमेदवारांवर काही दबाव आणला होता का? दुसरे म्हणजे ज्या उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली, त्यांच्यावर काही दबाव होता का? किंवा त्यांना काही आमिष दाखवले होते का? जर असे काही झाले असेल तर पोलिसांत तक्रार दिली होती का? याबाबत आणखी कोणाच्या काही तक्रारी आहेत का? ज्या उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली, त्याने ती स्वखुशीने माघार घेतली का? या गोष्टी आम्ही अहवालात पाहणार आहोत. हा अहवाल आम्ही संबंधित महापालिका आयुक्तांकडून मागवले आहेत. तो अहवाल आल्यानंतर आम्ही बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांबाबत पुढील निर्णय घेणार आहोत, अशी माहिती निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. १४ जानेवारी २०२६



## थोडक्यात




पाटोदा : छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली.

### वाघोरा शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघोरा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि.१२ जानेवारी सोमवार रोजी सकाळी १० वाजता राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब व युवकांचे प्रेरणा स्त्रोत स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात



साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी राजमाता जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमापूजनाने केली. प्रमुख पाहुण्यांचे विद्यार्थिनीने स्वागत गीतातून व हार, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शाळेतील भाषणे, नृत्य, गीत गायन सादर केली. राजमाता जिजाऊ यांच्यावर आधारित नृत्य मार्गदर्शन केशव बादाडे यांनी केले.पाळणा गीत निदेशक केशव बादाडे यांनी गायले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी मुख्याध्यापक एन. आर. राठोड, प्रमुख पाहुणे विलासरावजी शेजुळ आबेगावकर, शा. व्य. स. अध्यक्ष अरुण बादाडे, उपाध्यक्ष गणेश बादाडे प्रतिष्ठित नागरिक बबनराव बादाडे हे होते. प्रास्ताविक संजय राठोड तर सूत्रसंचालन अंजली बादाडे व प्रज्ञा घाटूळनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेश झाटे, बबन कपाटे काम केले. उपस्थित यांचे आभार माधव गड्डापोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी जय जिजाऊ! जय शिवराय! या जय घोषाने सांगता झाली. कार्यक्रमास माता - पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोठेवाडी शाळेत राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या जयंतीनिमित्त किशोरवयीन मुली व महिलांना स्त्री रोग तज्ञ डॉ.सावित्रा घाटूळ यांनी अतिशय सुंदर असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष विलास खेत्री हे होते तर



कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने शाळेच्या शिक्षिका रूपाली बडवे,मनीषा गुळवे यांनी केली. तसेच विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम शिंदे यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे सहशिक्षक सतीश डोणे यांनी केले व आभार प्रदर्शन शाळेच्या सहशिक्षिका रूपाली बडवे यांनी केले. यावेळी शिक्षक आर.पी.राठोड, वसंत टाखणखार,शिवाजी व्यव्हारे, अंगणवाडी ताई व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# दोन विभागातून ९० लाखांची बिले उचलली

## या प्रकरणाची चौकशी करून आठ दिवसांत अहवाल सादर करा-खा.सोनवणे

बीड । प्रतिनिधी

रोजगार हमी योजना अंतर्गत झालेल्या कामात यंत्रणा आणि बांधकाम विभाग या दोन्ही बाजूने देयके उचलली गेली. यात जिल्ह्यात ९० लाख रुपयांच्या निधीची उचल झाली आहे, याबाबत यंत्रणांनी चौकशी करून ८ दिवसात अहवाल सादर करावा अशी निर्देश त्यांनी यावेळी दिले.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेत २०२४-२५ साठी ३९८ कोटींचा विमा मंजूर झाला होता. त्यातील ३९७ कोटीच्या आसपास निधी शेतकऱ्यांना वर्ग झाला आहे. मात्र जिल्ह्यातील १०,५०० शेतकऱ्यांचे आधार वेरिफिकेशन झालेले नसल्याने एक कोटी नऊ लाख रुपये परत गेला आहे. याबाबतचे कार्यवाही पूर्ण करण्याचीही सूचना खासदार महोदयांनी सभेत केली. संसद सदस्यांना ज्याप्रमाणे प्रशिक्षण दिले जाते तसे प्रशिक्षण नव्याने निवडून आलेल्या सरपंचांना चांगले प्रशिक्षण द्या ज्यामुळे ग्रामीण विकास कामास गती प्राप्त होईल असे खासदार सोनवणे यावेळी म्हणाले.

केंद्र शासनाच्या योजना जिल्ह्यात राबवताना सर्व यंत्रणांनी समन्वय राखणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन खासदार बजरंग सोनवणे यांनी जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) सभेत केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात समितीची सभा खासदार सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत समितीचे सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक संगीता पाटील, समिती चे सदस्य मोहन जगताप, अंजली आखाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**प्रधानमंत्री पीक विमा** : प्रधानमंत्री पिक विमा योजनेत बोगस सातबारा दाखल करून ७७९२ जणांनी पिक विमा उचलला हे स्पष्ट झाले आहे. याबाबत आतापर्यंत गुन्हे दाखल का झाले नाही अशी विचारणा करून खासदार सोनवणे यांनी यासंदर्भात गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही लवकर करण्याचे निर्देश कृषी अधिकाऱ्यांना दिले. जिल्ह्यात कुसुम सौर पंप योजनेअंतर्गत १,३८,४५२ अर्ज शेतकऱ्यांकडून प्राप्त झाले आहेत. यातील १४,१२५ कामे पूर्ण झाले आहेत. याबाबतीत बीड जिल्हा अग्रक्रमावर आहे. सोबतच प्रधानमंत्री सुर्यघर योजना अंतर्गत जिल्ह्यात ७४ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे असे सभेत सांगण्यात आले.

लखपती दिदी योजना

केंद्र सरकारच्या लखपती दिदी योजनेअंतर्गत ८८,२१५ इतके उद्दिष्ट प्राप्त झाले आहे, यात उद्दिष्टापलीकडे जात ८८७१७ प्रकरणे पूर्ण झाले आहेत. वैयक्तिक शौचालय अंतर्गत ४६०० तर सार्वजनिक शौचालय अंतर्गत ३५५ कामे जिल्ह्यात प्रस्तावित आहेत.

वनविभाग घनकचरा व्यवस्थापक, पाणीपुरवठा, पशुसंवर्धन तसेच केंद्राच्या योजना राबविणाऱ्या सर्व कार्यालयांच्या कामाचा आढावा या सभेत घेण्यात आला. ग्रामीण विकास यंत्रणा संचालक संगीता पाटील यांनी प्रास्ताविक केले तर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आभार प्रदर्शन केले.

## स्वराज्य महोत्सव अंतर्गत किल्ला बनवा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील श्री योगेश्वरी जयहिंद ग्रुप तर्फे दि.११ जानेवारी रविवारी योगेश्वरी नूतन विद्यालय व योगेश्वरी कन्या गोदावरीबाई कुंकूलोळ विद्यार्थी,विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभागी होऊन महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांच्या प्रतिकृती हुबेहुब बनविल्या. नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती व शिवजयंती दरम्यान हा स्वराज्य महोत्सव संपन्न होत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रविवारी सकाळी विद्यार्थ्यांनी किल्ल्यांच्या प्रतिकृती बनविल्या बनवण्याची लगबग सुरू केली आपला किल्ला जास्तीत जास्त दर्जेदार व हुबेहूब संबंधित किल्ल्याची प्रतिकृती व्हावी यासाठी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले विधायक कार्यात विद्यार्थ्यांना संधी देऊन चांगल्या कामात गुंतवून ठेवून ऐतिहासिक माहिती विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे माहीत झाल्याबद्दल अनेक पालकांनी समाधान व्यक्त करून योगेश्वरी जयहिंद ग्रुपचे आभार मानले.



सकाळ पासून दुपार पर्यंत परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांनी किल्ले बनवून सज्ज केले. या काळात विद्यार्थी मोबाईल व टीव्हीपासून दूर होते ही या स्पर्धेची जमेची बाजू आहे असे मतही कांही पालकांनी मांडले. किल्ला बनवा स्पर्धेचे परीक्षण योगेश्वरी नूतन विद्यालयातील चित्रकला शिक्षक गणेश कदम यांनी केले.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.सोमवारी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, प्राचार्य रमण देशपांडे यांनीही या आकर्षक बनविलेल्या किल्ल्याची पाहणी केली.या किल्ला बनवा स्पर्धेसाठी श्री योगेश्वरी जयहिंद ग्रुप चे अध्यक्ष मेजर प्रा. एस.पी.कुलकर्णी पदाधिकारी अनंत लोमटे,बी.आर.मस्ने, दत्ता बनसोडे,राहुल देशपांडे आदींनी परिश्रम घेतले.

पान ६ वरुन...

### दिंद्रुडच्या चंद्रभागा पोद्दार

यामध्ये जिजाऊ माँ साहेब, बाल शिवाजी, महात्मा ज्योतीबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि स्वामी विवेकानंद यांसारखे विद्यार्थ्यांचे सजीव देखावे, तसेच पारंपरिक लोक कलाकारांनी सादर केलेले पोवाडा मधून अफजलखानाचा वध, सावित्रीबाईंच्या शिक्षणाची चळवळ, नाट्ये, महापुरुषांवर भाषणे, नृत्य सादरीकरण आणि स्वामी विवेकानंदांचे चे विचार गावकऱ्यांच्या मनाला भावले.

पारंपरिक लोक कलेसह विद्यार्थी विविध वेशभूषेत या शोभायात्रेत सहभागी झाले होते. जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, महात्मा ज्योतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांना घोडेस्वारी करत कार्यक्रम स्थळी आणण्यात आले. भजनी मंडळी, लेझीम पथक, ध्वजधारी विद्यार्थ्यांनी नगरीचे वातावरण भक्तीमय केले होते. दिंद्रुड व परिसरातील प्रतिष्ठित नागरिक यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर गावातून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले.

### दासखेड येथील प्राथमिक

रुग्ण, नातेवाईक तसेच कर्मचारी यांना दिलासा देणारे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळ्यात सावली, स्वच्छ हवा आणि मानसिक शांतता देणाऱ्या या झाडांमुळे प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूपच पालटले आहे. डॉ. हरिदास शेलार यांनी केवळ वृक्षलागवड करून थांबले नाहीत, तर रोपांचे संगोपन, पाणीपुरवठा व संरक्षणाची जबाबदारीही स्वतः पुढाकार घेऊन पार पाडली. कोणतीही शासकीय मदत अथवा प्रसिद्धी न घेता त्यांनी राबवलेला हा उपक्रम खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवणारा आहे.या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता वाढली असून, अनेकांनी वृक्षलागवडीसाठी पुढाकार घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. रुग्ण व नागरिकांकडून डॉ. हरिदास शेलार यांच्या कार्याचे मनापासून कौतुक होत असून, त्यांचा हा उपक्रम इतर सामाजिक कार्यकर्ते, संस्था व युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### १८ जानेवारीला पाटोद्यात

प्रभावी, लोकाभिमुख व उद्देशपूर्तीसाठी आवश्यक त्या महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.सदर महाशिबिर वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या परांगणात आयोजित करण्यात येणार असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू आहे. या शिबिरात विविध शासकीय व निमशासकीय विभागांचे स्टॉल्स उभारण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा थेट लाभ, अर्ज प्रक्रिया तसेच योजनांची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. याशिवाय नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला व विधी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.या महाशिबिरास न्यायाधीश मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील माननीय न्यायमूर्ती व बीड जिल्ह्यातील माननीय न्यायमूर्ती यांच्या उपस्थितीत उद्घाटन होणार आहे. यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या उपक्रमात पाटोदा वकील संघाचा सक्रिय सहभाग राहणार असून संपूर्ण नियोजन समन्वयाने व काटेकोर पद्धतीने सुरू आहे. पाटोदा शहर व तालुक्यातील नागरिकांनी या महाशिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासकीय योजनांचा लाभ घ्यावा व कायदेशीर माहिती मिळवावी, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रयत्न करणे आणि देवाची

देणारी शक्ती असून प्रार्थनेमुळे व्यक्तीमध्ये संयम आणि सहनशीलता त्याचबरोबर नैतिक मूल्य विकसित होत असतात.. चिकाटीने प्रयत्न केल्यास फळ उशिरा मिळाले तरी निराश न होता मानवी जीवनाची वाटचाल स्वीकार होत असते असे सांगून ते पुढे म्हणाले की, फलप्राप्तीसाठी देवाची प्रार्थना करणे म्हणजे फक्त इच्छापूर्तीची मागणी नव्हे तर मनाची तयारी आणि आत्मविश्वासाची वृद्धी आणि कर्माला योग्य दिशा देणे होय त्यासाठी प्रार्थना आणि प्रयत्न याचा योग्य समन्वय असण्याची आवश्यकता आहे असे सांगत ते म्हणाले की, सज्जन व्यक्ती या उपासना करत नाहीत मात्र दुर्जन व्यक्ती या उपासना करून सशक्त बनतात उपासना ही अत्यंत महत्त्वाची असून रावण देखील दुर्जन समजला जातो परंतु त्याने केलेल्या शिवभक्ती मुळे उपासनेमुळे रावण हा बलशाली समजला जात होता याचा अर्थ सज्जन व्यक्तीने उपासना करून बलशाली व्हावे.असाही संदेश त्यांनी शेवटी दिला श्रीराम कथा सोहळ्यामध्ये आज तिसऱ्या दिवशी प्रभू श्री रामचंद्राचा जन्मदिन सोहळा संगीतमय वातावरणात आणि उपस्थित महिला वर्गांनी अत्यंत उत्साहाने भक्तीपूर्ण वातावरणामध्ये पार पडला दैनंदिन नित्य प्रथेनुसार प्रवचनकार कीर्तनकार या संतांचे पूजन करण्यात आले आजचा या संत पुजनाचा मान सरपंच परिषदेला देण्यात आला होता आष्टी तालुका अध्यक्ष सुधीर पठाडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या संतांचे पूजन केले

### जिजाऊ जन्मदिवशी

शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख प्रमिलाताई माळी,सरपंच संजय धपाटे,पत्रकार संभाजी लांडे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, व्यापारी, शिक्षक, शेतकरी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मुलीच्या सन्मानासाठीचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या दिवशी ज्या कुटुंबात मुलगी जन्माला येते, त्या मुलीच्या नावे पाच हजार रुपयांची एफडी, एक पाळणा व रेशमी दोरी देण्याची परंपरा विनायक मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली कायम ठेवण्यात आली आहे. या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी जिजाऊंच्या कार्याचा गौरव करत प्रेरणादायी विचार मांडले व जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त एकमेकांना शुभेच्छा दिल्या.संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## ह.भ.प.लोखंडे महाराज यांना समाजभूषण पुरस्कार

पाटोदा । प्रतिनिधी

समाजातील अध्यात्मिक,धार्मिक व तर्कशास्त्रीय क्षेत्रात आगळेवेगळे व समाजोपयोगी कार्य करणारे ह.भ.प.राजू महाराज लोखंडे यांची गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. गंगाई-बाबाजी पुरस्कार संयोजन समितीच्या वतीने हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून त्यांच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.



ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजू महाराज लोखंडे यांचे प्राथमिक शिक्षण दिघोळ ता.जामखेड येथील जिल्हा परिषद शाळेत झाले.शालेय जीवनापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या महाराजांनी पुढे एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण केले.पाटोदा येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी खेमानंद महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले.काही काळ वैराग्यमूर्ती ह.भ.प.रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत सेवा केल्यानंतर अध्यात्मिक साधनेला पूर्णतः वाहून घेतले.

ब्रह्मचारी वृत्तीने जीवन जगत असताना त्यांनी तारखेच्या तर्कशास्त्रावर आधारित विलक्षण ज्ञान आत्मसात केले.कोणताही ज्योतिषशास्त्राचा औपचारिक अभ्यास न करता केवळ तर्कशक्तीच्या आधारे व्यक्तीची जन्मतारीख, वार तसेच जीवनातील संभाव्य घटना अचूकपणे सांगण्याची अद्भुत क्षमता त्यांनी प्राप्त केली आहे.त्यांच्या अनेक भाकितांचा अनुभव आजवर खरा ठरलेला असून राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक राजकीय व सामाजिक अंदाज चर्चेचा विषय ठरले आहेत.विशेष म्हणजे नैराश्यात सापडलेल्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्यातील येणाऱ्या सकारात्मक क्षणांची जाणीव करून देत आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांपासून परावृत्त करण्याचे समाजकार्य महाराज सातत्याने करत आहेत. तसेच सामाजिक, अध्यात्मिक व पर्यावरण विषयक जनजागृतीचे कार्य अहोरात्र सुरू आहे. यापूर्वी त्यांना समाजरत्न पुरस्कार १४ नोव्हेंबर २०२५ प्रदान करण्यात आला असून आता गंगाईबाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ जाहीर झाल्याने त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव झाला आहे.पुरस्कार मिळाल्याबद्दल हभप राजू महाराज लोखंडे यांचे आ.सुरेश धस,उद्योजक परमेश्वर शेठ येवले इंदौर,शिवसेना उपजिल्हाप्रमुख व चराठा पंचायत समिती इच्छुक उमेदवार गणेश उगले,राजुरी जिल्हा परिषद गटाचे शिवसेना महायुती इच्छुक उमेदवार सतीश शेळके,लिंबागणेश जिल्हा परिषद गटाचे एनसीपी इच्छुक उमेदवार संजय पवार,यांच्यासह या पुरस्कार निवडीबद्दल सर्व स्तरातून हभप राजू महाराज यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## युवकांनी संभाषण कौशल्य विकसित करणे ही काळाची गरज- डॉ. साळुंके

पाटोदा । प्रतिनिधी

आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात युवकांनी संभाषण कौशल्य विकसित करणे ही काळाची गरज आहे. त्याद्वारे त्यांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होऊ शकतात. असे प्रतिपादन कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कुशाबा साळुंके यांनी केले.





जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिराच्या पाचव्या बौद्धिक क्षेत्रात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. त्यांनी संभाषण कौशल्य व युवक या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शिवाजीराव काकडे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रवीण शिलेदार डॉ. रामकृष्ण प्रधान, प्रा. धनु ननवरे उपस्थित होते. पुढे बोलताना साळुंके म्हणाले की आधुनिक काळात युवकांनी संभाषण कौशल्य स्वतःमध्ये आत्मसात करून त्याचा उपयोग रोजगाराच्या संधी उपलब्ध करून घेण्यासाठी करावा. याप्रसंगी डॉ. प्रवीण शिलेदार डॉ.रामकृष्ण प्रधान यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. काकडे यांनी युवकांच्या सर्वांगीण विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचा सिंहाचा वाट आहे असे प्रतिपादन केले.याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी प्रा. बापू घोक्षे, डॉ. बंडू लोखंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. नारायण फुने यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. पापाजी चव्हाण यांनी केले.

## चिंचगव्हाण येथे संविधान वाचन सप्ताहास प्रारंभ - कास्ट्राईब

माजलगाव । प्रतिनिधी

महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी महासंघ व चिंचगव्हाण ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने लाऊड स्पीकर द्वारे कीर्तन पारायणच्या धर्तीवर संविधान वाचन सप्ताह उद्घाटन सोहळ्याने प्रारंभ झाला.या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक माजलगाव हे होते.तर प्रमुख मार्गदर्शक मिथुन जोगदंड होते.सदरील कार्यक्रमास सरपंच राजाभाऊ अर्जुन चिंचगव्हाण तसेच संतराम उगले सदस्य हरिभाऊ माने,रघुनाथ माने,श्रीम. हिराबाई कांबळे,रामेश्वर भदर्गे,दया कांबळे व नामदेव कोकाटे,नामदेव पाचपुते, राजरतन डोंगरे,बन्सी डोंगरे,शिवाजी धायजे, प्रभाकर साळवे,बाळासाहेब सोनसळे,गौतम डोंगरे,विजय उगले,भगवान साळवे श्रीम. सारिका बेद्रे,सुनिता झोडगे,शारदा तांगडे,अनुराधा साळवे,माया टाकणखार त्याचबरोबर ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी,विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारत




टाकनखार यांनी केले तर सूत्रसंचालन निलेश गावडे यांनी केले.

या उपक्रमांतर्गत आजपासून ग्रामपंचायत कार्यालय परिसरात संविधान वाचनास प्रारंभ करण्यात आला असून, या सप्ताहादरम्यान दररोज संविधानातील विविध अनुच्छेदांचे वाचन करण्यात येणार आहे. संविधानातील मूल्ये,नागरिकांचे हक्क व कर्तव्ये याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. उद्घाटनप्रसंगी मिथुन जोगदंड यांनी संविधान उद्देशिका शब्दातून मूल्यांची दिशा यावर सविस्तर मार्गदर्शन केले.राहुल सूर्यतळ यांनी संविधानाच्या प्रचार आणि प्रसाराची समाजास नितांत गरज असून,संविधानाला अभिप्रेत असलेला सुजाण भारतीय नागरिक यातून निश्चित घडेल असा विश्वास व्यक्त केला. भारतीय संविधानातील आदर्श व मूल्यांची ओळख करून देणारे नूरखा पठाण लिखित आपले संविधान राज्यपद्धती नव्हे तर जीवन पद्धती या पुस्तकाचे सात दिवसाचे वाचक वक्ते असणार आहेत श्रीमती सारिका बेद्रे,कविता दीक्षित,पुष्पा अर्जुन,एड.वैशाली डोंगरे,मंगलाताई काठुळे,सुजाता काळे,शाहिस्ता शेख तर यादरम्यानचे स्वागतअध्यक्ष माया टाकणखार,पूजा भारती,शितल काळे,निर्मला भाळशंकर,कविता उजगरे,शारदा तांगडे व सुनिता झोडगे या सप्ताहाचा समारोप संविधान विषयक कवी संमेलनाने होणार असून, या कवी संमेलनाचे अध्यक्ष श्रीमती सारिका बेद्रे तर प्रमुख पाहुणे डॉ अर्चना मोरे माधुरी साळेगावकर ह्या असणार आहेत या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन दुर्गा राऊत करणारा असून सहभागी कवियत्री गीता सोळंके,अनुराधा लाहोरकर,सुमन गाडे,प्रा.संगीता शेजुळ,पुष्पा देशमुख या आहेत. तर कवी संमेलनाची व्यवस्था उज्वला झोडगे अनुराधा साळवे करणार आहेत. एकंदरीत या संविधान वाचनाच्या माध्यमातून संविधानातील विचार नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. तेव्हा सर्वांनी या संविधान वाचन सप्ताह सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकाकडून करण्यात येते.या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये संविधानाविषयी जागरूकता वाढेल असा विश्वास ग्रामपंचायत व कास्ट्राईब पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.



### साने गुरुजी माध्यमिक शाळेत राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी

साने गुरुजी माध्यमिक विद्यालय परभणी के तालुका जिल्हा बीड येथे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ ४२८ जयंती मोठ्या उत,साहात संपन्न झाली तसेच स्वामी विवेकानंद यांची जयंती युवा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी केली युवा शब्द जर उलटा केला तर वायु होते वायू म्हणजे वादळ वादळ काय करू शकते हे आपण सर्वांना ज्ञात आहे त्यामुळे भारत हा जगातील सर्वात तरुण देश आहे व जगात जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश आहे राष्ट्रमाता राजमाता स्वराज यांनी जिजाऊ च्या कार्याचा प्रकाश जिजाऊ कार्याचा प्रकाश टाकण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री राऊत डी आर होते तर प्रमुख पाहुणे हे डॉक्टर आर के आरसूळ हे होते याप्रसंगी कुमारी निकिता गोरक्षनाथ शिंदे कुमारी पूजा भगीरथ गायकवाड अंकिता सिद्धेश्वर देसाई वैष्णवी वामन शिंदे यांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेतला व एक नाटक सादर करण्यात आले याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री तांदळे आर आर सहशिक्षक श्री कुठे संतोष शिंदे हनुमंत श्रीमती बडे सुरेखा श्री मुजमुले विनायक श्री उजगरे समाधान श्री शिंदे विश्वनाथ श्री तारळकर अमोल उत्तमराव विद्यार्थी पालक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम आनंदी वातावरणात संपन्न झाला.

cmyk

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यातील कारखान्याचा होणार सन्मान

पुणे : आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष व सहकारी साखर कारखानदारीच्या हीरक महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून सहकारी साखर कारखान्यांची गुणवत्ता वाढविणे. तसेच कारखान्यांमध्ये आर्थिक सक्षमता निर्माण करण्यासाठी स्पर्धात्मक गुणवत्ता असणाऱ्या कारखान्यांची निवड करून त्यांना सन्मानित करून प्रोत्साहित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यात ५००० टन प्रतिदिनपेक्षा कमी आणि त्यापेक्षा जास्त गाळप क्षमता अशी वर्गवारी करून कारखान्यांची निवड करून सर्वोत्कृष्ट ६ सहकारी व ६ खासगी साखर कारखान्यांची पारितोषिक विजेते म्हणून निवड करण्यात येणार आहे.

राज्यात सुमारे २०० कारखाने असून, त्यात सहकारी व खासगी कारखान्यांची संख्या सारखीच आहे. यातील अनेक कारखाने चांगली कामगिरी करून शेतकऱ्यांना वेळेवर उसाची बिले देतात. त्यातून हे कारखाने चांगला नफाही कमावतात. अशा



कारखान्यांकडून उत्पादकता वाढीसाठीही प्रयत्न केले जातात. कारखान्यातील कामगारांसाठी विशेष प्रयत्न केले जातात. तसेच संशोधित जातींचा प्रसार करण्यासाठीही शेतकऱ्यांमध्ये जागृती केली जाते.

अशा कारखान्यांना सध्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटकडून सन्मानित केले जाते. यात राज्य सरकारचा सहभाग नाही. या कारखान्यांना सन्मानित करण्यासाठी राज्यस्तरावरही पुरस्कार असावेत, असा प्रस्ताव राज्य सरकारपुढे होता. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

कारखान्यांच्या निवडीसाठी दोन समित्यांद्वारे छाननी केली जाईल. अर्जाचे पुनरावलोकन व पारितोषिक विजेत्यांची निवड करण्यासाठी छाननी समिती साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली आहे. प्रादेशिक सहसंचालक त्यांच्या विभागातील उत्कृष्ट असलेले प्रत्येकी ३ सहकारी कारखाने व ३ खासगी कारखान्यांची यादी छाननी समितीस सादर करतील.

त्यानंतर छाननी समिती प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून उत्कृष्ट १२ सहकारी व १२ खासगी साखर करखान्यांची यादी निवड समितीकडे सादर करेल.

या निवड समितीचे अध्यक्ष सहकारमंत्री असतील. तर सहकार राज्यमंत्री, सहकार विभागाचे प्रधान सचिव, साखर आयुक्त, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे उपसचिव सदस्य असतील. १२ उत्कृष्ट खासगी कारखान्यांच्या यादीमधून निवड समिती सर्वोत्कृष्ट ६ सहकारी व ६ साखर कारखान्यांची निवड करेल.

पुरस्कार देण्यासाठी ९ प्रकारांसाठी गुणांकन पद्धत

१) वेळेवर संपूर्ण रास्त आणि किफायतशीर किंमत देणे. २) सर्वाधिक साखर उतारा, प्रति हेक्टरी ऊस उत्पादन. ३) कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि सर्वाधिक क्षेत्र कव्हरेज. ४) कमी कार्बन उत्सर्जन आणि उच्च कार्बन क्रेडिट्स. ५) शासकीय कर्जाची वेळेवर परतफेड.

६) खर्च. ७) लेखापरीक्षण. ८) दोष दुरुस्ती अहवाल आणि एकूण कार्यक्षमता. ९) कर्मचारी संख्या मर्यादा व वेतन देणे यांचा समावेश आहे.

## सेंद्रिय भाजीपाल्याला वाढती मागणी

आरोग्याबाबतची जागरूकता वाढत असल्याने सेंद्रिय शेतमालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, या शेतमालाची मागणी वाढत आहे. यातून बाजारात सेंद्रिय, नैसर्गिक, रसायनमुक्त असे शब्दप्रयोग असलेले फलक व लेबल बघायला मिळतात. मात्र, भाजीपाला अथवा धान्य दिसायला ताजे, टवटवीत, हिरवेगार वाटत असले तरी हा शेतमाल सेंद्रिय असतोच, असे नाही. प्रत्यक्षात सेंद्रिय व रासायनिक शेतमालामधील फरक ओळखणे ग्राहकांसमोर मोठे आव्हान बनले आहे. केवळ नावावर किंवा विक्रेत्यांवर विश्वास न ठेवता वैज्ञानिक दृष्टिकोनातून चौकसपणे तपासणी करणे गरजेचे आहे.

सेंद्रिय शेती म्हणजे काय ? सेंद्रिय शेतमालाच्या उत्पादनासाठी कुठल्याही प्रकारच्या रासायनिक घटकांचा वापर केला जात नाही. या पिकांची वाढ व उत्पादन हे मातीचे आरोग्य व हवामानाची अनुकूलता यावर अवलंबून असते. या पिकांतील तण तसेच त्यावरील रोग व किडींच्या व्यवस्थापनासाठी रासायनिक खते, तणनाशके, कीटकनाशके, बुरशीनाशकांचा वापर केला जात नाही. या पिकांच्या उत्पादनासाठी शेणखत, कंपोस्ट खत, गांडूळ खत, हिरवळीची खते व इतर सेंद्रिय पदार्थांचा वापर केला जातो.

या बाबी तपासून घ्या : सेंद्रिय शेतमाल खरेदी करण्यापूर्वी त्याला नॅशनल प्रोग्राम फॉर ऑरगॅनिक प्रॉडक्शन (एनपीओपी) किंवा पार्टीसिपटोरी गॅरंटी सिस्टिम (पीजीएस) चे प्रमाणपत्र आहे का? त्यावर या दोन्हीपैकी एका संस्थेचा लोगो, क्रमांक आहे का ते तपासून बघा. त्या शेतमालावर उत्पादकाचे नाव, पत्ता, त्याला सेंद्रियतेचे प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थेचे नाव व पत्ता तपासून बघा.सेंद्रिय शेतमाल ओळखायचा कसा? : सेंद्रिय भाजीपाला व फळांचा आकार एकसारखा नसतो, तो लहान-मोठा असतो. रंग नैसर्गिक असतो व चमकदार नसतो. या शेतमालाचा गंध नैसर्गिक व थोडा जास्त तीव्र असतो. चव अधिक चविष्ट व नैसर्गिक असते. या शेतमालावर मातीचे अवशेष असू शकतात. तुलनेत रासायनिक घटकांचा वापर केलेल्या शेतमालाचा आकार व रंग एकसारखा, चमकदार व देखणा असतो. सेंद्रिय भाजीपाला व फळे जास्त वेळ ताजी राहतात, पण पाण्यात जास्त वेळ विरघळत नाहीत. या पिकांवर कीटकनाशकांची फवारणी केली जात नसल्याने हा शेतमाल कीड लागला किंवा त्यावर डाग असलेला दिसू शकतो. विक्रेत्याला तो ज्या शेतकऱ्याकडून सेंद्रिय शेतमाल खरेदी करतो, तो शेतकरी पिकांच्या उत्पादनासाठी कोणत्या कृषी निविष्ठांचा वापर करतो, याची व त्याच्या शेती करण्याच्या पद्धतीची विचारणा करा.



## हरभरा पिकावरील घाटे अळीचे नियंत्रण

ही अळी हरभऱ्याप्रमाणेच कापूस, ज्वारी, मका, तूर, टमाटे आणि इतर कडधान्य पिकांवर आढळून येते. परंतु हरभरा हे तिचे आवडते खाद्य असल्याने तिला घाटे अळी म्हणून ओळखले जाते. या किडीचा जीवनकाळ अंडी, अळी, कोष व पतंग अशा चार अवस्थेतून पूर्ण होतो. अळी अवस्था पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करते. पतंग मजबूत बांध्याचे, फिक्कट पिवळ्या रंगाचे व पंखावर एक कला ठिपका असलेले असतो. मागील पंखाच्या कडा धुरकट असतात.

नर व मादी पतंगाच्या मिलनानंतर मादी पतंग ३ ते ४ दिवसात पिकाच्या पानाफुलावर अथवा कोवळ्या शेंड्यावर १५० ते ३०० गोलाकार चकचकीत हिरवट पिवळसर रंगाची अंडी घालतात. अंड्यातून ६ ते ७ दिवसात भुरकट पांढऱ्या अळ्या बाहेर येतात. सुरुवातीच्या काळात अळ्या पानांच्या खालच्या बाजूस राहून पाने कुरतडून खातात. त्यामुळे पानांवर पांढरे डाग आढळून येतात. या काळातील नुकसान चटकन लक्षात येत नाही. कळ्या व फुले लागल्यानंतर अळ्या ते खातात. घाटे लागल्यानंतर अळी डोक्याकडील अर्धा भाग घाट्यात खुपसून आतील दाणे खाते. त्यामुळे घाट्यावर गोलाकार छिद्रे दिसुन येतात. अळीची पूर्ण वाढ १५ ते २० दिवसात ५ ते ६ वेळा कात टाकून पूर्ण होते. पूर्ण वाढलेली अळी ४ ते ५ सेमी लांब व गडद हिरव्या किंवा तपकिरी करड्या रंगाची असते आणि तिच्या शरीराच्या दोन्ही बाजूस करड्या अथवा पांढऱ्या रंगाचे पट्टे असतात. एक अळी पूर्ण वाढ अवस्थेत ३० ते ४० घाटे अथवा ६ ते ८ ग्रॅम दाणे खाते. अळीपासून पिकाचे साधारणत: ३० ते ४० टक्के नुकसान होते. कोषावस्थेत जाण्यापूर्वी अळीची १ ते २ दिवस भूक मंदावते व अळी झाडाच्या अवती भोवती जमिनीत ५ ते १० सेमी खोल



जाऊन अंगाभोवती मातीचे वेष्टण करून त्यामध्ये कोषावस्थेत जाते. कोष तांबड्या रंगाचे असून १.५ ते २ सेमी लांब असतात. हवामानानुसार कोषावस्था ८ ते १५ दिवसात पूर्ण होते. कोषातून परत रात्रीचे वेळी पतंग बाहेर पडतात आणि त्यांचे पुढील प्रजनन सुरु होते. अशाप्रकारे या किडीचा जीवनक्रम ३० ते ४० दिवसात पूर्ण होतो.

कीड व्यवस्थापन : हरभरा पिकाचे या किडीपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे व त्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करावी. हरभरा पिक एक महिन्याचे होईपर्यंत निंदणी आणि कोळपणी करून तण विरहीत ठेवावे. कीड नियंत्रणाची वेळ निश्चित करण्यासाठी आठवड्यातून एक दोन वेळेस पिकाची बारकाईने पाहणी करून पानांवर बारीक बारीक पांढरे डाग दिसून येताच अथवा पिकाच्या एक मीटर लांब ओळीत १-२ अळ्या आढळून आल्यास अथवा ५ टक्के घाट्यावर अळीचा उपद्रव दिसून येताच एक हेक्टर क्षेत्रात ८-१० फेरोमोन (कामगंध) सापळे बांबूच्या सहाय्याने पिकाच्या उंचीपेक्षा अधिक उंचीवर अडकवून सलग २ ते ३ दिवस प्रत्येक सापळ्यात ८-१० पतंग येत असल्यास कीटकनाशाकाची फवारणी/धुरळणी करावी. पीक फुलोऱ्यात आणि घाटे भरताना अळीचा प्रादुर्भाव वाढल्यास शक्य झाल्यास अळ्या वेचून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून नष्ट कराव्यात. पेरणी बरोबर ज्वारीची दाणे मिसळली नसल्यास शेतात पिकाच्या उंचीपेक्षा अधिक उंच इंग्रजी (टी) आकाराच्या काठ्या पक्ष्यांना बसण्यासाठी पक्षीथांबे म्हणून रोवाव्यात.

रासायनिक कीटकनाशाकांची फवारणी/धुरळणी शक्यतो पट्टा पद्धतीने पिकाच्या १ ते १.५ मी. रुंद एका आड एक पट्ट्यावर करावी व राहिलेल्या पट्ट्यावर ५-७ दिवसांनी परत फवारणी करावी जेणेकरून परोपजिवी/परभक्षी किडींचे संवर्धन होऊन त्यांची कीड नियंत्रणास मदत होईल. घाटे अळीच्या नियंत्रणाकरिता त्या अळीचा विषाणू (एच.ए.एन.पी.व्ही.) प्रती हेक्टर ५०० रोगग्रस्त अळ्यांचा अर्क फवारावा.

## विद्राव्य खतांच्या वापराने पिकांना होतो मोठा फायदा

खताची कार्यक्षमता वाढवायची असल्यास एक सर्वोत्तम पर्याय म्हणजे पाण्यात संपूर्णपणे विद्राव्य अशा खतांचा वापर करणे. विद्राव्य खते घन किंवा द्रव अशा स्वरूपात बाजारात उपलब्ध आहेत. त्यातील द्रवरूप विद्राव्य खते ही सामान्यपणे एक लिटरच्या स्वरूपात बाजारात उपलब्ध असून, त्यांचा वापर पानांवर फवारणीद्वारे केला जातो. हा वापर पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार व पिकांमध्ये अन्नद्रव्याच्या कमतरतेची लक्षणे दिसल्यास शिफारशीप्रमाणे करायचा असतो. ही अन्नद्रव्ये पिकांना लवकर उपलब्ध होतात.

पिकांच्या वाढीसाठी पोषक अन्नद्रव्ये देण्याच्या म्हणजेच खते देण्याच्या काही प्रमुख पद्धती आहेत. त्यात जमिनीतून घनरूप खते देणे किंवा ठिबक सिंचनाद्वारे पाण्यात विद्राव्य खते देणे यासोबतच पानांवर फवारणीद्वारे विद्राव्य खते यांचा समावेश होतो. जमिनीतून खते देण्याची पद्धत सर्वसामान्यपणे सर्वाधिक वापरली जाते. ही खते पेरणीच्या वेळी किंवा पिकाच्या वाढीच्या काळात दिली जातात. परंतु जमिनीत ओलावा खूप जास्त किंवा कमी असल्यास अशा घनरूप खतातून पुरविलेले अन्नद्रव्ये पिकांना लवकर उपलब्ध होत नाहीत. त्यांची कार्यक्षमता ही मातीचे तापमान, सामू, चुनखडीचे प्रमाण, सेंद्रिय कर्ब इ. जमिनीच्या गुणधर्मावरही अवलंबून असते. थोडक्यात, जमिनीतून दिलेल्या खतांमध्ये असलेल्या एकूण पोषक अन्नद्रव्यांपैकी प्रत्यक्ष पिकाला किती प्रमाणात अन्नद्रव्ये मिळाली,



याला त्या खताची कार्यक्षमता म्हणतात.

विद्राव्य खताचे महत्त्व : विद्राव्य खते ही मूलत: घन खताप्रमाणे दिसत असली तरी ती पाण्यात सहज विरघळतात. त्यात एक किंवा अनेक अन्नद्रव्यांचा समावेश असू शकतो. विद्राव्य खताचा वापर केल्यास, पिकांचे उत्पादन वाढ आणि फळांची गुणवत्ता सुधारते. पिकांना लवकर अन्नद्रव्ये उपलब्ध होत असल्याने पिकांची वाढ वेगाने होते. विद्राव्य खते ठिबक सिंचनाद्वारे दिल्यावर खतांची वापर कार्यक्षमता वाढते. विद्राव्य खते ही पारंपरिक खताच्या तुलनेत महाग वाटली तरी त्यांचा संतुलित वापर केल्यास अंतिमतः फायदेशीर ठरतात. अवर्षण (दुष्काळ) किंवा अतिवृष्टीच्या परिस्थितीत विद्राव्य खते पिकांना तग धरण्यास मदत करू शकतात. काही विद्राव्य खतामध्ये मुख्य आणि त्याचबरोबर दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्येसुद्धा असतात. विद्राव्य खते फवारणी किंवा ठिबक सिंचनाद्वारे पिकांना दिल्यास खतांचा व पाण्याचाही अपव्यय टाळता येतो.

चांगल्या विद्राव्य खताची लक्षणे : विद्राव्य खते ही हाताळण्यास सुलभ व सोपी असावीत. पाण्याच्या सामूमध्ये मोठा बदल करणारी नसावीत. विद्राव्य खते हे कोणत्याही तापमानात सहजासहजी विरघळणारी असावीत. हे खते एकमेकांमध्ये मिसळता यावीत. ठिबक सिंचनाद्वारे वापर करताना ड्रीपर व फिल्टर चोक होऊ नयेत. (१०० टक्के विद्राव्यता) पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार त्यांच्या ग्रेड्स बाजारात उपलब्ध असाव्यात. उदा. नत्र, फॉस्फरस, पालाश व इतर सूक्ष्म अन्नद्रव्यांचे प्रमाण योग्य असावे.फवारणी करताना घ्यायची काळजी : खते विरघळण्यासाठी स्वच्छ आणि चांगले पाणी वापरावे. सकाळी ९ ते ११ किंवा सायंकाळी ४ ते ६.३० वाजेपर्यंत फवारणी करावी. कारण या वेळेस वाऱ्याचा वेग आणि सूर्यप्रकाश कमी असतो. खत पूर्णपणे विरघळेपर्यंत पाणी ढवळत राहावे. कॅल्शिअम जास्त असलेल्या खतात थोडे गरम पाणी किंवा आम्लयुक्त पाण्याचा वापर करावा. अशा खतात कीटकनाशके, बुरशीनाशके, व इतर खते मिसळू नये. द्रवरूप खतांची बाटली सूर्यप्रकाश व उष्णतेपासून दूर ठेवावी. शिफारशीपेक्षा जास्त प्रमाणात खतांची फवारणी करू नये. ज्या पिकांच्या पानावर मेणयुक्त थर असतो, अशा पिकांवर फवारणी करताना द्रावणात स्टिकर मिसळावे. दोन किंवा अधिक खते एकत्र मिसळताना ती एकमेकांना पूरक आहेत कि नाही, याची खात्री करावी.




### जागतिक दिवस
### मकर संक्रमण

### महत्वाच्या घटना

१७६१ : मराठे आणि अफगाणी यांमध्ये पानिपतची तिसरी लढाई झाली. दुसर्याच दिवशी संपलेल्या या युद्धात अफगाण्यांचा विजय झाल्यामुळे भारतीय इतिहासाचा चेहरामोहराच बदलुन गेला.
१९२३ : विदर्भ साहित्य संघाची स्थापना झाली.
१९४८ : 'लोकसत्ता' हे मराठी वृत्तपत्र सुरू झाले.
१९९४ : मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार करण्यात आला.
१९९८ : दाक्षिणात्य गायिका एम.एस. सुब्बलक्ष्मी यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान जाहीर.
२००० : ज्येष्ठ समाजसेवक व गांधीवादी विचारवंत मुरलीधर देविदास ऊर्फ 'बाबा' आमटे यांना १९९९ चा गांधी शांतता पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५१ : अकबराच्या नऊ रत्नांपैकी एक अबुल फ़ज़ल यांचा जन्म.
१८८२ : रघुनाथ धोंडो तथा र. धों. कर्वे समाजस्वास्थ्यासाठी संततिनियमन आणि लैंगिक शिक्षण यांसाठी बुद्धिवादी विचारप्रवर्तन व प्रत्यक्ष कार्य करणारे विचारवंत, महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे ज्येष्ठ पुत्र (मृत्यू: १४ आक्टोबर १९५३)
१८८३ : निना रिकी जन्माने इटालियन असलेल्या फ्रेंच फॅशन डिझायनर (मृत्यू: ३० नोव्हेंबर १९७०)
१८९२ : शतायुषी क्रिकेटमहर्षी प्रा. दिनकर बळवंत तथा दि. ब. देवधर प्रथमश्रेणीचे ६२ सामने, १०० डाव, ११ वेळा नाबाद, ९ शतके, ३९५१ एकूण धावा, ४४.३९ सरासरी. भारत सरकारतर्फे त्यांना पद्मश्री (१९६५) व पद्मविभूषण (१९९१) या पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. (मृत्यू: २४ ऑगस्ट १९९३)
१८९६ : 'रिझर्व बँक ऑफ ईंडिया' चे पहिले गव्हर्नर सर चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख उर्फ सी. डी. देशमुख (मृत्यू: २ आक्टोबर १९८२)
१९०५ : दुर्गा खोटे हिन्दी व मराठी चित्रपटातील अभिनेत्री. सुमारे ५० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ३०० हून अधिक चित्रपटांत भूमिका केला. १९८२ मध्ये 'मी दुर्गा खोटे' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९९१)
१९०८ : ज्येष्ठ पत्रकार आणि रॉयवादी विचारवंत द्वा. भ. कर्णिक यांचा जन्म.
१९१८ : भारतीय महिला स्वातंत्र्य सैनिक सुधाताई जोशी याचा जन्म.
१९१९ : सय्यद अख्तर हुसेन रिझवी ऊर्फ 'कैफी आझमी' गीतकार (मृत्यू: १० मे २००२)
१९२३ : चित्तरंजन कोल्हटकर अभिनेते (मृत्यू: २५ आक्टोबर २००९)
१९२६ : महाश्वेता देवी बंगाली लेखिका नारायण कार्तिकेयननारायण कार्तिकेयन
१९३१ : सईद अहमद शाह ऊर्फ 'अहमद फराज' ऊर्दू शायर (मृत्यू: २५ ऑगस्ट २००८)
१९७७ : नारायण कार्तिकेयन भारतीय फॉर्म्यूला कार रेसिंग ड्रायव्हर
१९८२ : माजी प्रधान मंत्री इंदिरा गांधींनी२ सूत्री कार्यक्रमाची घोषणा.
१९९२ : माजी भारतीय क्रिकेटर दिनकर बळवंत देवधर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७४२ : एडमंड हॅले हॅलेच्या धूमकेतूचा शोध लावणारे ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ, भूवैज्ञानिक, गणितज्ञ, हवामानशास्त्रज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (जन्म:८ नोव्हेंबर१६५६)
१७६१ : सदाशिवराव भाऊ पानिपतच्या तिसर्या युद्धातील सरसेनापती (जन्म: ४ ऑगस्ट १७३०)
१७६१ : विश्वासराव पानिपतच्या ३ र्या युद्धात मारले गेलेले नानासाहेब पेशव्यांचे ज्येष्ठ चिरंजीव (जन्म: २ मार्च १७४२)
१८९८ : इंग्लिश लेखक आणि गणितज्ञ लुईस कॅरोल यांचे निधन.
१९२० : डॉज ऑटोमोबाईल कंपनीचे सहसंस्थापक जॉन फ्रान्सिस लबाडी यांचे निधन. (जन्म: २५ ऑक्टोबर १८६४)
१९९१ : चित्रगुप्त श्रीवास्तव ऊर्फ 'चित्रगुप्त' संगीतकार (जन्म:१६ नोव्हेंबर१९१७)
२००१ : फली बिलिमोरिया माहितीपट निर्माते




बुधवार दि.१४ जानेवारी २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत




# पवनचक्की कंपनीचा शेतकऱ्यांच्या हक्कांवर घाला

## खासगी शेतजमिनीत बेकायदेशीर विद्युत पोल व लाईन ;तात्काळ कायदेशीर कारवाईची मागणी डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरात पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कायदे, न्यायालयीन आदेश आणि शेतकऱ्यांचे मूलभूत हक्क अक्षरशः पायदळी तुडवत खाजगी शेतजमिनीत बेकायदेशीरपणे विद्युत पोल उभारून विद्युत लाईन टाकण्याचा उघड उघड मनमानी प्रकार केल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. कोणतीही लेखी परवानगी, संमती, पूर्वसूचना अथवा वैधानिक प्रक्रिया न करता थेट शेतजमिनीत घुसखोरी करण्यात आल्याचा गंभीर आरोप शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. सविस्तर माहिती अशी की, बीड तालुक्यातील मौजे लिंबागणेश येथील सर्व्हे नंबर १९७ मधील वडिलोपार्जित शेतजमीन डॉ. गणेश ढवळे यांच्या नावावर असून सदर जमीन त्यांच्या पूर्ण मालकी व प्रत्यक्ष कब्जात आहे. असे असतानाही ''टोरांटो'' पवनचक्की कंपनीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गावातील विद्युत पोल ओढण्याचे काम करणाऱ्या कंत्राटदारांना हाताशी धरून शेतकऱ्याला गृहीत धरत जबरदस्तीने शेतजमिनीत प्रवेश करून विद्युत पोल उभारले असून पुढील काळात विद्युत लाईन टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा घाट घातला आहे. हा प्रकार म्हणजे थेट शेतकऱ्यांच्या मालकी हक्कांवर केलेला घाला असल्याचे डॉ. ढवळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

सदर कृत्य हे भारतीय दंड संहिता कलम ४४१ व ४४७ अंतर्गत स्पष्टपणे फौजदारी स्वरूपाचा गुन्हा असून, जमिनमालकाची संमती नसताना खाजगी शेतजमिनीत प्रवेश करणे हा कायद्याचा उघड उघड अवमान आहे. तसेच विद्युत अधिनियम २००३ व , १८८५ मधील तरतुदींचा सर्रास भंग करून हा प्रकार करण्यात आला असून, संबंधित अधिकाऱ्यांनी कायद्याला जाणीवपूर्वक केराची टोपली दाखवली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या स्पष्ट निकालानुसार जमिनधारकाची संमती किंवा कायदेशीर परवानगीशिवाय खाजगी शेतजमिनीत विद्युत पोल व विद्युत लाईन उभारणे हे पूर्णतः बेकायदेशीर ठरते. असे असतानाही पवनचक्की कंपनीने न्यायालयीन आदेशांनाही हरताळ फासल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. शेतजमिनीत उभारण्यात आलेल्या विद्युत पोल व प्रस्तावित उच्चदाब विद्युत लाईनमुळे शेतीचे तुकडे पडत असून शेती उपयोगात गंभीर अडथळे निर्माण झाले आहेत. तसेच भविष्यात अपघात, जीवितहानी व मोठ्या आर्थिक नुकसानीचा धोका निर्माण झाला असून, यास संपूर्णपणे संबंधित पवनचक्की कंपनी जबाबदार राहील, असा ठाम इशारा डॉ. ढवळे यांनी दिला आहे. सदर बेकायदेशीर विद्युत पोल व लाईन तात्काळ हटवून इतरत्र स्थलांतरित न केल्यास, संबंधित पवनचक्की कंपनीचे अधिकारी, कर्मचारी तसेच परवानगी देणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करून न्यायालयीन लढा व तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट आणि कठोर इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला आहे.



# विकासाच्या मुद्द्यावर सुशीला दानवे यांना प्रचंड प्रतिसाद

जालना । प्रतिनिधी

जालना (प्रतिनिधी): जालना शहरात प्रथमच होत असलेल्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या प्रभाग क्र. १ (जागा - क) मधील अधिकृत उमेदवार सौ. सुशीला भास्कर दानवे यांच्या प्रचाराला नागरिकांचा, विशेषतः महिलांचा, वाढता प्रतिसाद मिळत आहे. प्रभागात कमळ चिन्हाचा प्रभाव दिवसेंदिवस अधिक बळकट होताना दिसून येत आहे.

सौ. सुशीला भास्कर दानवे या प्रचाराच्या निमित्ताने प्रभागातील विविध भागांत प्रत्यक्ष घराघरांत जाऊन नागरिकांशी संवाद साधत असून, स्वच्छ, सुंदर व महिलांसाठी सुरक्षित प्रभाग घडविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत प्रभागातील उमेदवार कल्याण भदनेकर, ज्योती सले, पद्मा मानधनी व भास्कर आबा दानवे या पाचही उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, तसेच रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज, आरोग्य



सेवा, शिक्षण व महिला सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर ठोस उपाययोजना राबविण्यात येतील, असे आश्वासन सौ. सुशीला भास्कर दानवे यांनी दिले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष योजना राबविण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रभागातील अष्टविनायक, हिंद नगर, दत्त नगर, सिंधी कॉलनी, गायत्री नगर, मनीष नगर, श्रीकृष्ण नगर म्हाडा, वैभव कॉलनी, वसुंधरा नगर, जिजामाता कॉलनी, ढवळेश्वर, शिक्षक कॉलनी, सकलेचा नगर, नगर व संभाजीनगर या परिसरांमध्ये सुरू असलेल्या प्रचार फेरीदरम्यान प्रत्येक घरापर्यंत जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या जात आहेत. या प्रचाराला नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिसत आहे.

# जालना महापालिका भाजपाच्या ताब्यात द्या

## मराठवाड्यात नंबर एकची महानगरपालिका बनवू – रावसाहेब दानवे

जालना । प्रतिनिधी

जालना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पार्टीला महापालिकेची संधी द्या, आम्ही जालना महानगरपालिकेला मराठवाड्यात नंबर एकची महानगरपालिका बनवून दाखवू असे आवाहन माजी केंद्रीय मंत्री व खासदार रावसाहेब पाटील दानवे यांनी आज गांधी चमन येथील प्रचार सभेत केले. जालना शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, आ.नारायणभाऊ कुचे, आ.संतोष पाटील दानवे, निवडणूक प्रमुख कैलासजी गोरंटयाल, भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या सह प्रभाग क्र.९ चे अधिकृत उमेदवार सौ. मंगल नंदकिशोर गरदास, सौ. संध्या



संजय देठे, श्री. महावीर रामकुमार ढक्का, श्री. विक्रांत महावीर ढक्का, प्रभाग क्र.१० चे श्री. विजय बाबुराव पवार, सौ. रुख्मिणी सुभाष पवार, सौ. कार्तिकी मनोज इंगळे, श्री. शेख नईम मोहम्मद, प्रभाग क्र.११ चे श्री. शेख अजीज शेख जमील मणियार, सौ. कान्होपात्रा गजानन लाड, सौ. हीना फिरदोस मोसिन खान, श्री. धरमसिंग रणजीतसिंग ठाकूर आदींची उपस्थिती होती.

दानवे पुढे म्हणाले की, भाजपाने केंद्र व राज्य पातळीवर विकासाचे मजबूत मॉडेल उभे केले आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, डिजिटल सुविधा आणि पारदर्शक प्रशासन या सर्व बाबींमध्ये भाजपाची ओळख आहे. जालना शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेत व दर्जेदार मिळाव्यात, यासाठी भाजपाची महापालिका आवश्यक आहे. आज जालना शहरासमोर पाणीटंचाई, वाहतूक कोंडी, अस्वच्छता, नियोजनाचा अभाव अशा अनेक समस्या आहेत. भाजपाच्या नेतृत्वाखाली या सर्व प्रश्नांवर ठोस उपाययोजना राबवण्यात येतील. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा थेट लाभ जालना शहरातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवला जाईल. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनीही भाजपाच्या विकासात्मक धोरणावर विश्वास व्यक्त करत नागरिकांनी सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. ''भाजपा म्हणजे केवळ निवडणूक नाही, तर विकासाचा संकल्प आहे,'' असे ते म्हणाले. सभेच्या शेवटी रावसाहेब पाटील दानवे यांनी जालनकरांना एकजुटीने भाजपाच्या उमेदवारांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन करत, ''जालना महापालिका भाजपाच्या ताब्यात द्या, आम्ही जालना शहराला मराठवाड्याचा आदर्श विकास मॉडेल बनवू,'' असा विश्वास व्यक्त केला.

# प्रचारासाठी उरले अवघे काही तास ; उमेदवारांसह कार्यकर्त्यांची धावपळ

अहिल्यानगर । प्रतिनिधी

महापालिका निवडणुकीचा प्रचार अंतिम शिगेला पोहोचला असून, मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांची धडपड चालल्याचे पहायला मिळत आहे. पदयात्रा, रॅली, कॉर्नर सभेसह रिक्षांच्या प्रचारामुळे वातावरण ढवळून निघाले आहे. राजकीय नेत्यांच्या सभेने आणखीन रंग भरले आहे. रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने भल्या सकाळपासून ते रात्रीपर्यंत मतदारांच्यागाठीभेटी घेण्यासाठी चढाओढ पहावयास मिळाली. राजकीय नेत्यांच्या सभेने प्रचाराचा धुराळा उडाला आहे. जाहीर प्रचार संपण्यास दोनच दिवस उरल्याने उमेदवारांसह कार्यकर्त्यांची दमछाक होणार आहे. मंगळवारी सायंकाळी पाच वाजेनंतर जाहीर प्रचार संपणार असून, छुपा प्रचार सुरू होणार आहे.

महापालिकेच्या ६३ जागांसाठी गुरुवारी मतदान होणार आहे. यापूव पाच जागा बिनविरोध झाल्या आहेत. २८३ उमेदवार रिंगणात आहे. त्यात महिलांची संख्या सर्वाधिक आहे. भाजप- राष्ट्रवादी काँग्रेस युती विरुद्ध शिवसेना तसेच महाविकास आघाडी असा सामना होत आहे. यंदा आरोप-प्रत्यारोपांच्या तोफा धडाडल्या नाही. त्याऐवजी सभा, पदयात्रा, पोस्टर्स, बॅनर्सच्या माध्यमातून प्रचारावर भर देण्यात आला. सोबत सोशल मीडियावर रीलसचा वापर प्रभावी माध्यम म्हणून करण्यात आला आहे. डिजिटल प्रचाराचा मतदारांवर विशेष प्रभाव पाडण्यासाठी राजकीय पक्षांची पुरेपर वापर केला.

# शाहू माध्यमिक विद्यालय येथे बाल आनंद मेळावा

माजलगाव । प्रतिनिधी

शाहू माध्यमिक विद्यालय पात्रुड येथे राजमाता माँ जिजाऊ साहेब भोसले व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले कार्यक्रमाचे उदघाटन शाळेचे संस्था अध्यक्ष वाघमारे ए. एम यांच्या हस्ते करण्यात आले यामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद घेतला विद्यार्थ्यांना छोट्या मोठ्या बाजारपेठेतील व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी अनेक खाण्याचे पदार्थ,भाजी विक्री, किराणा दुकान आशा साहित्याचे बरचसे दुकान लावण्यात आले होते.



तसेच विद्यार्थ्यांना नफा व तोटा याबद्दल समजले तसेच मान्यवरांनी कार्यक्रमावेळी बोलताना सांगितले की अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि प्रत्यक्ष बाजारातील खरेदी विक्रीच्या व्यवहाराचे ज्ञान मिळते शाळेच्या पटांगणावर भरलेल्या या आनंद बाजारामध्ये भेळ चटपटीत पदार्थ, लिंबू शरबत व हस्तकलेच्या वस्तूचे स्टोल्स लावले होते या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक मात्रे बी.के प्रमुख पाहुणे म्हणून पात्रुड जिल्हा परिषदेचे मुख्याध्यापक बनकर एन.आर,शिंदे पी.बी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गिन्यानदेव नावडकर,फजलु पटेल,नासिर शेख,बाळासाहेब शेटे,शिवाजी गव्हाणे तसेच शाळेतिला शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे

# रजिस्ट्री जळीतकांडाचा सीआयडीकडून तपास

छत्रपती संभाजीनगर

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नोंदणी व मुद्रांक शुल्क कार्यालयाच्या जळीतकांडाचा तपास सीआयडीकडे सोपविण्यात आला आहे. या पथकाने रविवारपासूनच तपासकामाला सुरुवात केली. त्यासाठी येथील तिन्ही दुय्यम निबंधक कार्यालये सोमवारी दिवसभर बंद ठेवण्यात आली. मंगळवारीही ही कार्यालये बंद होती. त्यामुळे दस्त नोंदणीचे काम ठप्प झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागील भागात नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाची तीन दुय्यम निबंधक कार्यालये आहेत. यातील कार्यालय क्रमांक १ ला शनिवारी आग लागली. एका व्यक्तीने खिडकीतून आगीचे लोळ टाकून हे कार्यालय पेटवून दिल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले आहे. या प्रकाराचे गांभीर्य विचारात घेऊन त्याचा तपास सीआयडीकडे देण्यात आला आहे.

सीआयडी पथक दोन दिवसांपासून तपास करत आहे. जमिनी, घरे खरेदी विक्रीच्या दस्त नोंदणीचे काम ठप्प झाले आहे. नोंदणी विभागाच्या कार्यालयांचे काही महिन्यांपूर्वीच नूतनीकरण करण्यात आले होते. जळीतकांडामुळे यातील १ कार्यालय पूर्णपणे जळाले. आतील पडदे, संगणक, प्रिन्टर, लाकडी कपाट, त्यातील दस्तऐवज, वॉल फॅन असे साहित्य जळून गेले. आगीचा धूर संपूर्ण कार्यालयात पसरल्याने कार्यालयातील इतरही संगणक, कपाट, फर्निचर आणि इतर साहित्य काळवंडून खराब झाले आहे. कर्मचाऱ्यांनी या परिसरातील काही सीसीटीव्ही फुटेज तपासले असता पहाटे ४.४५ वाजता डोक्यावर टोपी घातलेला एक व्यक्ती नोंदणी विभागाच्या मागील गेटने प्रवेश करीत असल्याचे दिसून येतो. त्याच्या हातामध्ये कापडी पिशवी असून, काही वेळानंतर या सीसीटीव्हीमध्ये आगीचे प्रतिबिंब दिसून येते. त्यानंतर हा व्यक्ती ४.५० ला त्याच गेटने परत जाताना दिसून येतो. मात्र जाताना त्याच्या पिशवीमध्ये काहीही नसल्याचे दिसून येत आहे. विडीकीतून आगीचे लोळ फेकल्याचेही यात दिसून येत आहे.

नोंदणी कार्यालयामध्ये तुकड्यांची बेकायदेशीर नोंदणी होत असल्याबाबत संदीप वायसळ यांनी पुराव्यानीशी तक्रार नोंदविली होती. त्याची दखल घेत सह जिल्हा निबंधक विवेक गांगुर्डे यांनी मागील तीन महिन्यांत झालेल्या दस्तांच्या नोंदणीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश नुकतेच दिले होते. त्यानंतर दोनच दिवसांत येथील कार्यालयाला आग लागली.

# माणुसकीची परंपरा जपणारा 'माई वृद्धाश्रम'

## अनाथ वृद्धमातांसाठी मोफत प्रवेशाची सेवाभावी चळवळ



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

समाजातील अनाथ, निराधार व वंचित वृद्धमातांसाठी मायेचा आधार ठरणारा ''माई वृद्धाश्रम'' माणुसकीच्या परंपरेचे जिवंत उदाहरण ठरत आहे. नफ्यापेक्षा ममतेला आणि नियमांपेक्षा माणसाला प्राधान्य देत या वृद्धाश्रमात गरजू वृद्धमातांना पूर्णतः मोफत प्रवेश दिला जातो. छत्रपती संभाजीनगर शहरातील आनंदनगर, शिवाजीनगर परिसरात वसलेल्या या आश्रमात चार मजली सुसज्ज इमारतीत वृद्धमातांसाठी सुरक्षित, स्वच्छ व सन्मानजनक निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. स्वतंत्र हॉल, खोल्या, स्वच्छ संडास-बाथरूम, पौष्टिक व स्वच्छ भोजन, भव्य हॉलमधील टीव्ही व प्रोजेक्टरद्वारे मनोरंजन, तसेच नामांकित डॉक्टरांकडून नियमित आरोग्य तपासणी कॅम्प यामुळे येथे निवास करणाऱ्या मातांना कुटुंबासारखे वातावरण लाभते.

सण, उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आश्रमात हास्याचे क्षण निर्माण केले जातात. येथे सेवा केली जाते ती केवळ औपचारिकतेने नव्हे, तर स्वतःच्या आईप्रमाणे मायेने हीच या आश्रमाची खरी ओळख आहे.माई वृद्धाश्रमाच्या संचालिका मीरा वाघमारे (आदर्श शिक्षिका) आणि संस्थेचे अध्यक्ष रामदास वाघमारे (समाजभूषण, आदर्श शिक्षक) यांच्या नि:स्वार्थ समर्पणातून ही सेवा उभी राहिली आहे. विशेष म्हणजे, या वृद्धाश्रमाला कोणतेही शासकीय अनुदान नसून, स्वतःच्या खर्चातून व समाजातील दानशूर हातांच्या सहकार्याने ही चळवळ अखंड सुरू आहे.''ही सेवा समाजावरच अवलंबून आहे,'' असे सांगत संचालक मंडळाने नागरिकांना मदतीचे आवाहन केले आहे. अन्नधान्य, किराणा सामान, औषधे, कपडे किंवा आर्थिक स्वरूपातील छोटासा हातभारही एखाद्या वृद्धमातेच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटवू शकतो. आश्रमात प्रवेशासाठी वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, ओळखपत्र, पासपोर्ट फोटो व जबाबदारी घेणाऱ्या व्यक्तीची माहिती आवश्यक असून, सर्व प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने केली जाते. ''मातृसेवा हीच ईश्वरसेवा'' या भावनेतून चालणाऱ्या माई वृद्धाश्रमाशी जोडले जाणे म्हणजे ममतेचा उत्सव साजरा करण्यासारखे आहे. एका शेअरमुळे, एका मदतीमुळे एखाद्या माऊलीला सुरक्षित आसरा, दोन वेळचे अन्न आणि प्रेमळ कुटुंब मिळू शकतेहीच या सेवाभावी कार्याची खरी ताकद आहे.

# मतदान व मतमोजणीसाठी अहिल्यानगर शहरात कडक बंदोबस्त ;असे असणार नियोजन

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या गुरूवारी (१५ जानेवारी) मतदान प्रक्रिया पार पडणार असून, शुक्रवारी (१६ जानेवारी) मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शहर पोलिसांकडून दोन दिवसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मतदान व मतमोजणी शांततेत पार पाडण्यासाठी सुमारे दोन हजारांहून अधिक पोलीस अधिकारी, अंमलदार व होमगार्ड रस्त्यावर असणार आहेत. महापालिका निवडणुकीसाठी आज मंगळवार (१३ जानेवारी) हा जाहीर प्रचाराचा शेवटचा दिवस आहे.

सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत प्रचाराची मुदत असून, त्यानंतर उद्या (बुधवारी) छुप्या प्रचार केला जाणार आहे. मतदानाच्या पूर्वसंध्येला मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवार व त्यांच्या समर्थकांकडून विविध क्लृप्त्या वापरल्या जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी खबरदारीचे उपाय योजले आहेत. निवडणूक प्रचारादरम्यान शहरातील काही भागांत धमकावणे, शिवीगाळ व मारहाणीच्या घटना घडल्या आहेत. या घटनांचा उद्रेक मतदान किंवा मतमोजणीच्या दिवशी होऊ नये, यासाठी पोलिसांनी दिवसा व रात्रीची गस्त वाढवली आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे.शहरातील १७ प्रभागांमध्ये एकूण ३४५ मतदान केंद्रांवर मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी यासाठी आवश्यक मनुष्यबळ, साहित्य आणि सुरक्षा व्यवस्था पूर्णतः सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांना भयमुक्त वातावरणात मतदान करता यावे, यासाठी पोलीस प्रशासन विशेष दक्षता घेत आहे. दरम्यान, मतमोजणी शुक्रवारी सकाळी ९.३० वाजता एमआयडीसीतील वखार महामंडळाच्या गोडाऊनमध्ये सुरू होणार आहे. त्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठीही मतदानाच्या दिवशी असलेलाच बंदोबस्त कायम ठेवण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मतदानासाठी एकूण १ हजार ८०० कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, मतदान केंद्रांवर पाणी, वीज, बैठक व्यवस्था यासह सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लोकशाहीचा हा उत्सव यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी निर्भयपणे आणि उत्स्फूर्तपणे मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक १, पोलीस उपअधीक्षक ४, प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक १, पोलीस निरीक्षक ६, सहायक पोलीस निरीक्षक/उपनिरीक्षक ११८, प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक १५, पोलीस अंमलदार १,०६६, एसआरपीएफ कंपनी १, दंगा नियंत्रण पथक (आरसीपी) २, स्ट्रायकिंग फोर्स पथक ५, होमगार्ड ६५०. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने चार दिवस मद्यविक्री बंद (ड्राय डे) ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. अहिल्यानगर महापालिका हद्दीत १३ जानेवारी सायंकाळी ६ वाजल्यापासून ते १६ जानेवारी रोजी मतमोजणी पूर्ण होईपर्यंत दारूची दुकाने, बार व परमिट रूम बंद राहणार आहेत.

# चार कोटीला गंडा घालणारा आरोपी कराडमध्ये पकडला

## केज पोलिसांची कामगिरी; आरोपी विरुद्ध १५ ठिकाणी गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**मेडिकल कॉलेजला प्रवेश मिळवून देतो म्हणून आतापर्यंत तीन कोटी ८६ लाख रुपयाला गंडा घालणारा आरोपी सौरभ कुलकर्णी याला केज उपविभागीय कार्यालयातील पोलिसांनी सातारा जिल्ह्यातील कराड येथे ताब्यात घेतले. त्याच्यावर तब्बल १५ ठिकाणी फसवणुकीचे गुन्हे दाखल असून धारूर येथील डॉ. अविनाश तोंडे यांना ६५ लाखाला गंडवल्यावरून या आरोपीचा शोध लागला.**

धारूर तालुक्यातील सोनी मोहा येथील डॉ. अविनाश रामचंद्र तोंडे हे बारामती येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी एस के एज्युकेशन संस्थेच्या फेसबुक अकाउंट वरून नागपूर येथील सौरभ सुहास कुलकर्णी याचा नंबर मिळवून त्याच्याशी ओळख झाली. डॉक्टर तोंडे यांना एमडी मेडिसिन साठी मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळवून देतो म्हणून आरोपीने ६५ लाख रुपयांची मागणी केली होती. कुलकर्णी यांना दिनांक २० ते २९ सप्टेंबर २०२४ या कालावधीत डॉक्टर तोंडे यांनी आठ लाख रुपये काही फोन पे वरून तर काही रोख दिले. पहिल्या यादीत प्रवेश मिळवून देतो असे सांगूनही कोणत्याही यादीत फिर्यादीचे नाव आले नाही. डॉक्टर तोंडे यांना प्रवेश मिळाला नाही. त्यावरून सौरभ कुलकर्णी यांनी आपली फसवणूक केली हे डॉक्टर तोंडे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पैशाची मागणी केली असता मी पैसे देणार नाही तुला काय करायचे ते कर असे उत्तर दिले. या प्रकरणी डॉक्टर अविनाश तोंडे यांनी धारूर पोलीस ठाण्यात तक्रार देऊन याप्रकरणी गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री वेंकटरामन यांनी हा तपास स्वतःकडे घेतला. या तपासाची चक्रे वेगाने फिरवून त्यांनी या आरोपीविरुद्ध १५ ठिकाणी गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळवली. नाशिक येथील सरकार वाडा, सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी, जालना जिल्ह्यातील चंदन जीरा, घनसांगवी, नागपूर जिल्ह्यातील धंतोली, पुणे जिल्ह्यातील खडकी, मुंबई जिल्ह्यातील दहिसर, सोलापूर जिल्ह्यातील विजापूर नाका सोलापूर शहर, नागपूर जिल्ह्यातील धंतोली, पंजाब राज्यातील अमृतसर, नागपूर शहरातील जरीपटका, सांगली जिल्ह्यातील तासगाव, नागपूर शहराजवळ हुडकेश्वर, गुजरात मधील डेस सिटी, धारूर आदी ठिकाणी या आरोपीने फसवणूक करून लोकांना तीन कोटी ८६ लाख६१००० रुपयाला गंडा घातला असल्याचे निदर्शनास आले. सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटरामन यांनी या प्रकरणाचा जलद गतीने तपास करून आरोपीची गोपनीय, टेक्निकल ऍनालिसिस सेलकडून तसेच इतर माध्यमातून माहिती काढून आरोपीचा ठावठिकाना माहित करून घेतला. आरोपीला पकडण्यासाठी केज उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील तपास पथक रवाना केले. या पथकाने दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी आरोपीला सातारा जिल्ह्यातील कराड येथून ताब्यात घेतले. अधिक तपास केला असता या आरोपीने आणखी पंधरा ठिकाणी गंडा घातल्याचे स्पष्ट झाले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत ,अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री व्यंकटरामन, पोलीस उपनिरीक्षक जावेद कराडकर, पोलीस उपनिरीक्षक अमीर इनामदार, पोलीस नाईक मंदे आदींनी केली.

# आरटीओ ऑफिससाठी १२ कोटींचा निधी

## आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश

बीड । प्रतिनिधी

बीड येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अर्थात आरटीओ ऑफीसच्या बांधकामांसाठी तब्बल १२ कोटी रूपयांचा भरघोस निधी मंजूर झाला आहे. यातून आ.संदीप क्षीरसागर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून बीडच्या आरटीओ ऑफिसला स्वतःच्या मालकीची इमारत नव्हती. बीड शहरातील विविध ठिकाणी किरायाच्या जागेत सदरील महत्वाचे कार्यालय चालत होते. त्यामुळे नागरिक, अधिकारी व वाहनधारक यांना सोयीसुविधांच्या





अभावामुळे अडचणींना सामोरे जावे लागत होते. बीडच्या आरटीओ ऑफिसचा प्रश्न प्रलंबित होता. ही बाब लक्षात घेऊन बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी आरटीओ ऑफिससाठी एक सुसज्ज इमारत असावी याकरिता शासनदरबारी पाठपुरावा केला होता. त्यावर आता शासनाकडून या कामासाठी तब्बल १२ कोटी रूपयांचा भरघोस निधी प्रशासकीय मान्यतेसह मंजूर करण्यात आला आहे. यामुळे बीडच्या आरटीओ ऑफीससाठी एक सुसज्ज आणि सर्व सोयी-सुविधांनी परिपूर्ण इमारत मिळणार आहे. या कामास मंजुरी दिल्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार व महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत.

# बीडीओंसह इतरांसाठी लाच घेणारा सरपंच पकडला; धाराशिव एसीबीची बीडमध्ये कारवाई

बीड । प्रतिनिधी

नरेगाअंतर्गत विहिर मंजूर करून त्यावर बीडीओंसह इतरांच्या सह्या घेण्यासाठी लाचेची मागणी करण्यात आली. केज तालुक्यातील तरनळी ग्रामपंचायतीचे सरपंच महादेव प्रताप खेडकर (वय ३५, रा.तरनळी ता.केज, जि. बीड) यांना ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. ही कारवाई मंगळवारी (दि.१३) सायंकाळी करण्यात आली.



तक्रारदाराने २३ डिसेंबर २०२५ रोजी तक्रार दिली होती. कार्यारंभ तक्रारदार व अन्य तिघांच्या शेतजमिनीत एमआरईजीएस योजनेंतर्गत जलसिंचन विहीर मंजूर करून देण्यासाठी प्रत्येकी २५ हजार रुपये, असा एकूण १ लाख रुपयांचा खर्च मागितल्याचा आरोप करण्यात आला होता. तक्रारीच्या अनुषंगाने २३ व २४ डिसेंबर २०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. त्यात सरपंच खेडकर यांनी विहिरीच्या प्रस्तावावर सही करून बीडीओ व इतर अधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळवून देण्यासाठी तक्रारदाराकडून १० हजार व उर्वरित तिघांकडून प्रत्येकी २० हजार रुपये, असा एकूण ७० हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. १ जानेवारी २०२६ रोजी पहिली सापळा कारवाई करण्यात आली असता आरोपीने थेट रक्कम स्वीकारली नाही. त्यानंतर १३ जानेवारी २०२६ रोजी केज पंचायत समितीच्या पाठीमागील खेडकर यांच्या रूममध्ये सापळा कारवाई करण्यात आली. कार्यारंभ यावेळी तक्रारदाराकडून पंचासमक्ष ७० हजार रुपये स्वीकारताना त्यांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी सरकारतर्फे फिर्याद पोलिस निरीक्षक विजय हनुमंत वगरे यांनी दाखल केली असून पुढील तपास बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिट्टमल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक समाधान कवडे करत आहेत.

# दिंद्रुडच्या चंद्रभागा पोद्दार शाळेमध्ये सावित्री-जिजाऊ-विवेकानंद जन्मोत्सव साजरा

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील चंद्रभागा पोद्दार लर्न स्कूल आयोजित क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंतीनिमित्त भव्य शोभा यात्रा मोठ्या उत्साहाच्या वातावरणात काल सोमवारी (दि.१२) पार पडली. दिंद्रुड (ता.माजलगाव) येथील जुने बसस्थानक परिसरात विद्यार्थ्यांनी परिसरात विविध कला प्रदर्शन करत जयंती महोत्सव उत्साहात साजरा केला. तसेच परिसरात विविध ठिकाणी जिजाऊ-सावित्री-विवेकानंद जन्मोत्सव साजरा करण्यात आला.



माँसाहेब जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची शाळेचे प्राचार्य व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून जिजाऊ वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संयुक्त जन्मोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांच्या सहभागाने सोमवारी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.



# दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वृक्षलागवडीमुळे हिरवळीची चळवळ

पाटोदा । प्रतिनिधी

दासखेड (ता. पाटोदा, जि. बीड) येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. हरिदास शेलार यांनी मागील सहा महिन्यांपासून प्राथमिक आरोग्य केंद्र दासखेड येथे सातत्याने वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाचा स्तुत्य उपक्रम राबविला आहे. पर्यावरण संरक्षणाची जाण ठेवून त्यांनी दवाखाना परिसरात विविध देशी वृक्षांची लागवड केली असून, आज या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहेत.

पूर्वी कोरडा व मोकळा दिसणारा दवाखान्याचा परिसर आता हिरवीगार वनराईने बहरलेला असून,

◀◀ पान ३ वर

# मुला पाठोपाठ महिनाभरात आईचाही मृत्यू

## रुक़साना बेगम मुहम्मद शरीफ शेख यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

शहरातील जव्हेरी गल्ली भागातील रहिवासी मुहम्मद शरीफ शेख यांच्या पत्नी, गेवराई पोलीस ठाणे येथे कर्तव्यरत असलेले पोलीस जमादार हनीफ शेख यांच्या मातोश्री आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्या मावशी आणि काकू रुकसाना बेगम यांचे प्रदीर्घ आजारानंतर आज दिनांक १२ जानेवारी २०२६ सोमवार रोजी सकाळी निधन झाले. मृत्यू समयी त्या ६५ वर्षांच्या होत्या.

त्या गेल्या काही वर्षापासून मधुमेह आणि रक्तदाबाच्या आजाराने त्रस्त होत्या. गेल्या काही महिन्यात त्यांच्यावर बीड आणि औरंगाबाद येथील रुग्णालयात औषधोपचार सुरू होते मात्र त्यांच्या शरीरावर औषधोपचाराचे काही एक परिणाम झाले नाही. सोमवार दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. गेल्या महिन्यात १० डिसेंबर रोजी त्यांचे मोठे पुत्र सलीम शेख यांचेही आकस्मिक निधन झाले होते. एका महिन्याच्या अंतराने आईचाही निधन झाल्याने शेख कुटुंबीयांवर दुहेरी शोककळा पसरली आहे. त्यांची नमाज़ ए जनाज़ा तकीया मस्जिद येथे करण्यात आली तर दफनविधी महेदवीया दायरा कब्रस्तान मोमीनपुरा येथे करण्यात आला.

# जिजाऊ जन्मदिवशी जन्मलेल्या मुलीच्या नावावर पाच हजाराची एफडी -मुळे

वडवणी । प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वडवणी तालुका संपर्क कार्यालयात सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता माँ साहेब जिजाऊ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम शिवसेना वडवणी तालुका प्रमुख मा.विनायक बप्पा मुळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.



यावेळी माँ साहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास वडवणीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप,उपनगराध्यक्ष बन्सी मुंडे,ज्येष्ठ शिवसैनिक बंडू जाधव,बब्रुवान शेंडगे, शेळके महाराज,दीपक उजगरे,युवराज शिंदे, महादेव जमाले,वकील भास्कर उजगरे,संतोष डावकर, शिवाजी तौर,वचिष्ट शेंडगे,

◀◀ पान ३ वर

# १८ जानेवारीला पाटोद्यात शासकीय योजनांचे भव्य महाशिबिर ; प्रशासन व न्याययंत्रणा सज्ज

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथे दि. १८ जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने शासकीय योजनांचे भव्य महाशिबिर आयोजित करण्यात येणार असून या महाशिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासन व न्याययंत्रणा सज्ज झाली आहे. या अनुषंगाने पाटोदा येथे महत्त्वपूर्ण पूर्वतयारी बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस पाटोदा न्यायालयाचे मा. न्यायाधीश एम.



ए. शिंदे, उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख, तहसीलदार दत्तात्रय निलावाड, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव वहाब सय्यद, मुख्याधिकारी अभय कुमार जोशी, पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, न्यायालयाचे कार्यालयीन अधीक्षक पाठक यांच्यासह विविध प्रशासकीय विभागांचे प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत शिबिराच्या संपूर्ण पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. यामध्ये शिबिरस्थळावरील सुविधा, विविध विभागांचे स्टॉल्स, नागरिकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा, सुरक्षितता व्यवस्था तसेच कायदेशीर मार्गदर्शनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मा. न्यायाधीश एम. ए. शिंदे यांनी शिबिर

◀◀ पान ३ वर

# उमेश लोढा यांना मातृशोक

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील महावीर जिनिंग चे मालक तथा प्रतिष्ठित व्यापारी उमेश अमृतलाल लोढा यांच्या मातोश्री शामलाबाई अमृत लाल लोढा याचे १३ ०१ मंगळवार रोजी पहाटे दुःखद निधन झाले त्यांचे मृत्यू समयी वय ७५ वर्षाचे होते स्वर्गीय शामलाबाई लोढा ह्या धार्मिक वृत्तीच्या असून त्यांनी दि ०८/ ०१/ २०२६ पासून सजक अवस्थेमध्ये संथारा व्रत धारण केले प. पू. महाराष्ट्र प्रवर्तनी प्रतिभाकवरजी म. सा. के मुखारबिंद से धारण केले त्या व्रताची पूर्णाहुती १३ /०१ रोजी झाली त्यांचा स्वभाव मनमिळावू असल्याने त्या गावात धार्मिक वृत्तीचे असल्याने सर्व परिचित होत्या त्यांचे ऐन संक्रांतीच्या सणात निधन झाले हे विशेष बाब आहे त्याच्या अंत्यविधीस जैन समाजातील आप्त मंडळी यांच्यासह चौसाळा गावातील परिसरातील सर्व नातेवाईक व प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बहुसंख्येने आवर्जून उपस्थित होते त्यांच्या मागे दोन मुले उमेश व राजेश लोढा व एक मुलगी सुना व नातवंडे असा परिवार आहे त्यांच्या निधना मुळे गावात हळहळ व्यक्त केले जात आहे.



# प्रयत्न करणे आणि देवाची प्रार्थना करत फलप्राप्तीसाठी वाट पाहणे ही जीवनाच्या यशस्वीतेची त्रिसूत्री-महंत मंदार महाराज रामदासी

आष्टी । प्रतिनिधी

परिश्रमपूर्वक प्रयत्न करून देवाची प्रार्थना केल्यास ती सफल होत असते, भक्त हा आळशी असेल तर मनुष्याची प्रार्थना सफल होत नाही देवाची भक्ती म्हणजे परम पुरुषार्थ होय.. आपल्या सर्व संतांनी पराकोटीचे प्रयत्न करून देवाची प्रार्थना केल्यामुळे ते सफल झाले आहेत त्यामुळे प्रयत्नपूर्वक देवाची प्रार्थना करणे आणि फलप्राप्तीसाठी धैर्यपूर्वक वाट पाहणे ही जी मानवी जीवनाच्या यशस्वीतेची त्रिसूत्री आहे असे प्रतिपादन दादेगाव येथील समर्थ भक्त देवदास स्वामी मठाचे महंत मंदार महाराज रामदासी यांनी केले





आष्टी येथील आमदार सुरेश धस यांचे वतीने आयोजित श्रीराम कथा ज्ञान यज्ञ सोहळ्यातील तिसऱ्या दिवशी कथा निरूपण करताना ते बोलत होते

पुढे बोलताना महंत मंदार महाराज रामदासी म्हणाले की,

मनुष्य जेव्हा एखाद्या कार्याची सुरुवात करतो त्यावेळी त्या कार्याच्या यशासाठी तो देवाची प्रार्थना करतो...कामाची फलप्राप्ती म्हणजे केलेल्या कर्माचे अपेक्षित फळ मिळणे होय.. भारतीय संस्कृतीमध्ये फलप्राप्तीसाठी देवाची प्रार्थना करणे ही श्रद्धा विश्वास आणि आत्मिक बळ यांची अभिव्यक्ती मानली जाते..

या देवाच्या प्रार्थनेमुळे मनाला शांतता मिळते.. कार्य करताना येणारा ताण भीती आणि शंका कमी होतात.. सकारात्मक विचार वाढल्यामुळे व्यक्ती अधिक आत्म विश्वासाने काम करू शकते..

श्रद्धा आणि आत्मविश्वास याबाबत विचार करता देवावर विश्वास ठेवल्यामुळे आपण एकटे नाही अशी भावना निर्माण होते आणि ही श्रद्धा व्यक्तीला चिकाटीने प्रयत्न करण्यास प्रेरणा देते त्यामुळे अधिक चांगली फलप्राप्ती होत असते..मानवाचे कर्म देखील चांगले असावे चांगले कर्म केल्याशिवाय फळ मिळत नाही फक्त प्रार्थना करून फलप्राप्ती होत नसते तर प्रार्थना ही कर्माला दिशा

◀◀ पान ३ वर

# नुकसानग्रस्त विहिरीचा हप्ता दोन दिवसात मिळणार

**बीड । प्रतिनिधी**

ऑगस्ट -सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टीने घोडका राजुरी सर्कलमध्ये विहिरीचे मोठ्या नुकसान झाले होते. या नुकसान भरपाई पोटी शेतकऱ्यांना पंधरा हजार रुपयांचा हप्ता येत्या दोन दिवसात मिळणार असल्याची माहिती गटविकास अधिकारी सानप यांनी शिवसेनेच्या शिष्टमंडळाला दिली.



ऑगस्ट व सप्टेंबर २०२५ मध्ये घोडका राजुरी पंचायत समिती गणमध्ये अनेक शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. याचे पंचनामे ही झालेले आहेत. या शेतकरी बांधवांना तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा या मागणीसाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्या सूचनेनुसार शिवसेनेचे शिष्ट मंडळ बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सानप यांना भेटले. यावेळी गटविकास अधिकारी सानप यांनी येत्या दोन दिवसात या शेतकऱ्यांना पंधरा हजार रुपयांचा हप्ता देण्यात येईल.तसेच उर्वरित रक्कम पंधरा हजार रुपये त्यानंतर वितरित करण्यात येणार असल्याची माहिती शिष्टमंडळाला दिली. या शिष्टमंडळामध्ये सतीश शेळके, शिवसेना तालुकाप्रमुख संतोष जाधव, उपजिल्हाप्रमुख माऊली खांडे, प्रदीप माने, सुरेश खुरणे, प्रफुल्ल पाठक, संतोष मस्कर संतोष मते, सिद्धेश्वर मसवले, राहुल भांबे, संदीप नवले ,रोहित जाधव, राहुल टेकाळे आदींचा सहभाग होता.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मनोरमा खेडकर यांचा शस्त्र परवाना रद्द

**पुणे । प्रतिनिधी**

वादग्रास्त बडतर्फ आयएएस अधिकारी पूजा खेडेकरची आई मनोरमा खेडकर यांच्याकडील शस्त्र परवाना पोलिसांनी रद्द केला आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. मुळशीतील धडवली गावातील शेतकऱ्याला पिस्तुलाचा धाक दाखवून धमकावल्याच्या आरोपावरून मनोरमा खेडकरसह सात जणांविरुद्ध पौड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबतचा एक व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली होती.

पोलिसांच्या माहितीनुसार, मनोरमा खेडकरविरुद्ध २०२४ मध्ये पौड पोलिस ठाण्यात शेतकऱ्याला पिस्तुलाच्या जोरावर धमकावल्याच्या आरोपावरून आर्म क्टनुसार गुन्हा दाखल आहे. तसेच नवी मुंबई येथील रबाळे पोलिस ठाणे आणि चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात देखील विविध कलमानुसार गुन्हे दाखल आहेत. त्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी मनोरमा यांना तुमचा शस्त्र परवाना रद्द का करण्यात येऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस दिली होती. सुरुवातीला अनेकदा नोटीस दिल्यावरही त्यांनी आपला खुलासा सादर केला नव्हता. दरम्यान, काही दिवसांपूर्वी मनोरमा यांनी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन आपले म्हणणे मांडले होते.



त्यावेळी त्यांनी आपल्या जिवाला धोका असल्याचे म्हटले होते. त्यानंतर मनोरमा यांनी आपला खुलासा सादर केला होता. त्यांचा खुलासा पोलिसांना समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. या वेळी खेडकर यांनी आपल्या दिलेल्या जबाबात आपल्या जिवाला धोका असून, त्याला जबाबदार पोलिस आयुक्त राहतील. तसेच आपण याबाबत २६ जानेवारी रोजी संचलनाच्या ठिकाणी आमरण उपोषण करणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. आयुक्तालयात आपले म्हणणे सादर करण्यासाठी मनोरमा यांना बोलावले असता, कॅमेरा आदी साहित्यासह मोठा फौजफाटा घेऊन त्या आयुक्तालयात दाखल झाल्या होत्या.

पोलिस आयुक्तांनी आपल्या आदेशात म्हटले आहे की, मनोरमा यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता, तो समाधानकारक दिसून येत नाही. खेडकर यांचे वर्तन हे गुन्हेगारी वृत्तीचे व कायद्यास न जुमाननारे असून, भविष्यात मंजूर शस्त्राचा गैरवापर केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसेच कुटुंबातील व्यक्ती, सर्वसामान्य नागरिकांच्या जीवितास धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तुम्ही शस्त्राचा दुरुपयोग करून परवानाविषयक अटी शर्तींचा भंग करण्याची दाट शक्यता असून, तुम्ही शस्त्र परवाना धारण करण्यास योग्य व्यक्ती नाही, अशी आमची खात्री झाल्याने शस्त्र परवाना रद्द करण्याचे आदेश देण्यात येत असल्याचे पोलिस आयुक्तांनी आदेशात म्हटले आहे.

मनोरमा खेडकर यांच्या बाणेरमधील बंगल्यात दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री लुटीचा प्रकार घडला. खेडकर यांच्या घरात दहा दिवसांपूर्वी कामाला आलेला नेपाळी स्वयंपाकी आणि साथीदारांनी बंगल्यात जबरी चोरी केल्याची प्राथमिक माहिती तपासात समोर आली. खेडकरच्या आई-वडिलांना जेवणातून गुंगीचे औषध देण्यात आले. मध्यरात्री १ च्या सुमारास पूजा खेडकर बंगल्यात आली, तेव्हा बेशुद्धावस्थेतील आई-वडिलांना तिने पाहिले. नेपाळी कामगाराने खेडकरचे हातपाय चिकटपट्टीने बांधले. त्यानंतर कामगार आणि त्याच्याबरोबर असलेले साथीदार दागिन्यांची लूट करून पसार झाल्याची प्राथमिक माहिती आहे. याप्रकरणी रविवारी रात्री उशिरा चतु:शृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, याबाबत पोलिसांनी स्वतः तक्रार दिली आहे.

# लोहगावात राजमाता जिजाऊ संकल्पनामा प्रसिद्ध

**वाघोली । प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून लोहगाव येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने 'राजमाता जिजाऊ संकल्पनामा' प्रसिद्ध करण्यात आला. हा संकल्पनामा केवळ राजकीय घोषणा नसून लोहगाव, विमाननगर, सोमनाथ नगर व वाघोली परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच महिला सक्षमीकरणासाठी घेतलेली एक ठाम शपथ आहे, असे प्रतिपादन भाजप नेते रामभाऊ दाभाडे यांनी केले.

या संकल्पनाम्यातून राजमाता जिजाऊंच्या विचारांवर आधारित विकासाचा आराखडा मांडण्यात आला असून, त्यात विशेषतः महिलांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे. महिलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे, सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना राबवणे, हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे दाभाडे यांनी सांगितले. संकल्पनाम्यात प्रभागातील पायाभूत सुविधांचा विकास, रस्ते, पाणीपुरवठा व वीज या मूलभूत प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. तसेच तरुण पिढीसाठी दर्जेदार शैक्षणिक सुविधा आणि नागरिकांच्या आरोग्यासाठी सुसज्ज आरोग्य केंद्रे उभारण्यावर भर देण्यात आला आहे. लोहगावचा



ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपण्याचाही मानस यामध्ये व्यक्त करण्यात आला आहे. जिजाऊंच्या विचारांचा वारसा, विकासाचा नवा भरवसा या घोषवाक्यानुसार जर या संकल्पनाम्याची अंमलबजावणी झाली, तर प्रभागाचा चेहरामोहरा निश्चितच बदलेल, असा विश्वास रामभाऊ दाभाडे यांनी व्यक्त केला. या वेळी प्रभाग क्रमांक ०३ मधील भाजप गटाच्या सौ. श्रेयस प्रीतम खांदवे, सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे, अनिल दिलीप सातव, रामदास दत्तात्रय दाभाडे यांच्यासह नागरिक व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांनी घेतलेला हा पुढाकार लोहगावच्या नागरिकांसाठी विकासाची नवी आशा निर्माण करणारा ठरेल, असे मत अनिल सातव यांनी व्यक्त केले. दरम्यान, सखी प्रेरणा मंचच्या वतीने द्वारका गार्डन, सोमनाथ नगर येथे आयोजित करण्यात आलेला हळदी-कुंकू समारंभ उत्साहात पार पडला. महिलांशी थेट संवाद साधत त्यांच्या प्रश्नांना समजून घेण्याचा आणि त्यांच्या सन्मानाचा सुंदर प्रसंग यावेळी अनुभवायला मिळाला. लोहगाव-विमाननगर-वाघोली प्रभाग क्रमांक ३ साठी पुणे महानगरपालिकेचे भाजप उमेदवार अनिल सातव यांच्या उपस्थितीत कार्यक्रम अधिक उत्साहात साजरा करण्यात आला. महिलांच्या सक्रिय सहभागातून विकास, सुरक्षितता व सशक्तीकरणाबाबत सकारात्मक चर्चा झाली. याशिवाय विमाननगर येथील झिरकोन सोसायटीमध्ये आयोजित करण्यात आलेली कोपरा बैठकही सकारात्मक वातावरणात पार पडली. प्रभागाच्या विकासासाठी नागरिकांनी मांडलेल्या सूचनांबद्दल आम्ही ऋणी आहोत, असे रामभाऊ दाभाडे यांनी सांगितले. महिला शक्तीवर विश्वास ठेवून विकासाच्या दिशेने वाटचाल करण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

# माँसाहेब जिजाऊ हे आम्हा शिवसैनिकांचं स्फूर्तीस्थान:निलम गोऱ्हे

**कात्रज । प्रतिनिधी**

माँसाहेब जिजाऊ हे आम्हा शिवसैनिकांचं स्फूर्तीस्थान असून राजमाता जिजाऊंनी दाखवलेला मार्ग आजच्या पिढीने आत्मसात करण्याची गरज आहे. त्यांनी घडवलेला शिवरायांचा विचार महत्वाचा असल्याचे मत विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी मांडले.

पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३७ (धनकवडी-कात्रज डेअरी) येथे शिवसेनेच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त महिलांच्या पुढाकारातून 'राजमाता जिजाऊ वंदन कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम



धनकवडीतील गुलाबनगर चौक येथील शिवसेना निवडणूक कचेरीत मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी गोऱ्हे बोलत होत्या. यावेळी प्रभाग क्रमांक ३७मधील शिवसेनेच्या सागर विठ्ठल बारणे, सुलक्ष्मी हिरामण धनकवडे, मोहिनी राजेंद्र देवकर, गिरीराज तानाजीराव सावंत या चारही उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक, कार्यकर्ते, तसेच प्रभागातील नागरिक आणि माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांमध्ये विशेष उत्साह दिसू आला. उपस्थितांनी जिजाऊंच्या विचारांवर चालणाऱ्यांनाच जनतेचे आशीर्वाद मिळतील, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमामुळे प्रभाग क्रमांक ३७ मध्ये शिवसेनेच्या प्रचाराला अधिक बळ मिळाले आहे. विरोधकांच्या निष्क्रियतेवर आणि दुटप्पी भूमिकेवर नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# भारती विद्यापीठात भव्य रक्तदान शिबिर; ५८६ दात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे । प्रतिनिधी**

भारती विद्यापीठाच्या ९३७ स्वयंसेवकांनी रक्तदानासाठी केलेल्या विक्रमी नोंदणीतून ५८६ जणांनी रक्तदान केले. रक्तचे नाते' चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक राम बांगड यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले.

भारती विद्यापीठाच्या धनकवडी येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने संस्थापक डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त आणि प्र-कुलगुरू डॉ. विश्वजित कदम यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राम बांगड यांनी रक्तदानाचे आरोग्यदायी फायदे सांगून तरुणांना या उदात्त कार्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांनी महाविद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.



कुलगुरू डॉ. विवेक सावजी यांनी रक्तदात्यांना 'खरे हिरो' संबोधत, गेल्या ३३ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमाच्या सातत्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. या शिबिराला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. एकूण ९३७ स्वयंसेवकांनी नोंदणी केली असून, दिवसभरात ५८६ पेक्षा जास्त रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. याप्रसांगी भारती परिवाराचे अध्यक्ष बाबा शिंदे, प्राचार्य डॉ. राजेश प्रसाद, उपप्राचार्या डॉ. सुनीता जाधव, एन.एस.एस. अधिकारी प्रा. प्रशांत यादव आणि विविध ब्लड बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ. सुनीता जाधव यांनी प्रास्ताविक केले, डॉ. प्रिया हिरवे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. प्रशांत यादव यांनी आभार मानले.

# वडगाव नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादीचे सुनील ढोरे बिनविरोध

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

वडगाव नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील गणेश ढोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच स्वीकृत नगरसेवकपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे पंढरीनाथ राजाराम ढोरे व भारतीय जनता पक्षाचे संदीप भास्करराव म्हाळसकर यांचीही बिनविरोध निवड झाली. या निवड प्रक्रियेचे पीठासन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष अबोली मयूर ढोरे यांनी काम पाहिले. निवड प्रक्रिया पारदर्शक व कायदेशीर बाबींची पूर्तता करत पार पाडण्यात आली. यावेळी मुख्याधिकारी डॉ. प्रवीण निकम उपस्थित होते. सोमवारी (दि. १२) सकाळी ११ वाजता उपनगराध्यक्षपदासाठी नामनिर्देशन अर्ज सादर करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनील ढोरे, तर भाजपकडून अर्चना म्हाळसकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र छाननीनंतर माघारीच्या मुदतीत भाजपच्या उमेदवाराने अर्ज मागे घेतल्याने सुनील ढोरे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. स्वीकृत नगरसेवकपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून पंढरीनाथ ढोरे आणि भाजपकडून संदीप म्हाळसकर यांचा प्रत्येकी एकच अर्ज आल्याने दोन्ही निवडी बिनविरोध



झाल्या. नगराध्यक्ष अबोली ढोरे यांच्या अध्यक्षतेखाली या निवडी अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आल्या. निवडीनंतर नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांचा नगरपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला. वडगाव नगरपंचायतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ९, भाजप महायुतीचे ६, तर २ अपक्ष नगरसेवक निवडून आले आहेत. यावेळी भाजपाचे प्रभारी भास्करराव म्हाळस्कर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, गणेश ढोरे, सुधाकर शेळके, माजी सभापती गुलाब म्हाळसकर, अशोक बाफना गटनेते अजय बाळासाहेब म्हाळसकर, पक्षनेत्या माया चव्हाण, तसेच नगरसेवक अनंता कुडे, विशाल वहिले, गणेश म्हाळसकर, पूनम भोसले, सुनीता ढोरे, वैशाली सोनवणे, राणी म्हाळसकर, रोहित धडवले, अजय भवार आदी उपस्थित होते.

# बारामतीत रासप, दोन अपक्ष नगरसेवकांची राष्ट्रवादीला साथ

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती नगरपालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने सत्ता स्थापन केल्यानंतर नगरपालिकेतील गटनेते, उपगटनेते तसेच विविध समित्यांच्या प्रभारी पदांची निवड करण्यात आली. यावेळी रासप, दोन अपक्षांनी राष्ट्रवादीला पाठिंबा दिल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सत्ता असलेल्या नगरपरिषदेत बळ वाढले आहे. या घडामोडींमुळे विरोधकांचा आवाज क्षीण होणार असल्याची प्रतिक्रिया उमटली आहे.

या प्रक्रियेमुळे नगरपालिकेतील राजकीय हालचालींना वेग आला असून विरोधी पक्षनेतेपद कोणाकडे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अशा परिस्थितीत नगरपालिकेतील निवडून आलेल्या तीन नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसला जाहीर पाठिंबा दिल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाच्या नगरसेविका वनिता अमोल सातकर यांनी सहयोगी पक्ष राष्ट्रवादीला पाठिंबा दिला आहे. अपक्ष नगरसेवक निलेश भारत इंगुले व मनीषा संदीप बनकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला पाठिंबा देत सत्ताधारी गटात सहभागी



होण्याचा निर्णय घेतला आहे. नगरसेवकांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची नगरपालिकेतील ताकद आणखी वाढली असून विरोधकांची संख्या कमी झाली आहे. परिणामी विरोधी पक्षनेतेपदाबाबतची चर्चा आता अधिकच गुंतागुंतीची झाली आहे. राष्ट्रवादीला मिळालेल्या या पाठिंब्यामुळे आगामी काळात नगरपालिकेतील निर्णयप्रक्रियेत सत्ताधारी गटाचा प्रभाव अधिक मजबूत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या घडामोडींमुळे बारामतीतील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून पुढील काळात आणखी काही नगरसेवक सत्ताधारी गटात सामील होतील का, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. बारामती नगरपरिषद निवडणुकीत सत्ताधारी राष्ट्रवादीला पहिल्यांदा सोपी वाटणारी निवडणूक शेवटच्या टप्प्यात चुरशीची झाली. निकालानंतर रासप, शरद पवार यांच्या पक्षाला एक, दोन अपक्ष असा कौल मिळाला होता. त्यामुळे बारामतीवर कमांड असलेल्या अजित पवार गटाला धक्का मानला जात होता. अपक्ष उमेदवारांची चर्चा निकालानंतर राज्यात गाजली होती. मात्र, नगरपरिषदेच्या समितींच्या पदांच्या निवडीत रासप, दोन अपक्ष नगरसेवकांनी सत्ताधारी पक्षाच्या गोटात जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे हे नगरसेवक सत्तेच्या सारीपाटावर विराजमान झाले आहेत.

# लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी पदभार स्वीकारला

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

राजगुरुनगर नगरपरिषदेचे लोकनियुक्त प्रथम नगराध्यक्ष म्हणून मंगेश वसंतराव गुंडाळ यांनी आज (दि. १२) मोठ्या उत्साहात पदभार स्वीकारला. याचवेळी झालेल्या विशेष सभेत मनोहर सांडभोर यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने या नगरपरिषद निवडणुकीत मोठे यश मिळवले असून, पदग्रहण सोहळयास सर्वपक्षीय नगरसेवक, नागरिक व विविध पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजगुरुनगर नगरपरिषदेसाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले होते, तर २१ डिसेंबरला मतमोजणी पार पडली. या निवडणुकीत मंगेश गुंडाळ यांची नगराध्यक्षपदी मोठ्या मताधिक्याने निवड झाली. नगरपरिषदेत एकूण १० नगरसेवक निवडून आले असून (त्यापैकी १ बिनविरोध), राष्ट्रवादी काँग्रेसचे ५, भाजपचे ४ आणि २ अपक्ष नगरसेवक



बिनविरोध निवडून आले आहेत. या निकालात शिंदे गटाच्या शिवसेनेने नगराध्यक्षपदावर आपला ठसा उमटवला आहे. सोमवारी (दि. १२) नूतन पदाधिकार्यांचा पदग्रहण सोहळा पार पडला. मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी पदाधिकार्यांचे स्वागत केले. नगरपरिषद कार्यालय रांगोळी, फुलांच्या माळा व पायघड्यांनी सजवण्यात आले होते. सकाळी नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी पदभार स्वीकारला, तर दुपारी साडेबारा वाजता झालेल्या विशेष सभेत मनोहर सांडभोर यांची उपनगराध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. शिंदे गटाकडून सचिन मधवे, तर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून सागर सातकर यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाली.

उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांच्या समर्थकांनी गुलाल उधळत व डीजेच्या तालावर मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला.या वेळी शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष व माजी पंचायत समिती सभापती भगवान पोखरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, सचिन लांडगे, नगरसेवक वैभव घुमटकर, निलेश घुमटकर यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक उपस्थित होते. पदभार स्वीकारण्यापूर्वीच शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यास सुरुवात करण्यात आली असून, पुढील काळात विकासकामांना गती दिली जाईल, असे अतुल देशमुख यांनी सांगितले. भगवान पोखरकर यांनी राजगुरुनगर व चाकण नगरपरिषदेत शिवसेनेची निर्विवाद सत्ता प्रस्थापित झाल्याबद्दल मतदारांचे आभार मानले. तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका पक्ष स्वबळावर लढविण्याची घोषणा केली. या निकालामुळे पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिंदे गटाच्या शिवसेनेचा प्रभाव अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट झाले असून, राजगुरुनगरच्या सर्वांगीण विकासाबाबत नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

# खंडोबाचीवाडीत खडी क्रशरला कडाडून विरोध

**सोमेश्वरनगर । प्रतिनिधी**

खंडोबाचीवाडी (ता. बारामती) ग्रामस्थांनी एकजूट दाखवत ग्रामसभेत संभाव्य दगडखाण व खडी क्रशरला तीव्र विरोध केला आहे. मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी आपल्या गावाच्या हद्दीत भविष्यातही कोणत्याही प्रकारचा खडी क्रशर उभारणी अथवा दारू विक्री करण्यास कायमस्वरूपी मनाई करण्याचा ठराव एकमताने घेतला आहे.



वाघळवाडी येथील समर्थ ज्ञानपीठाचे अध्यक्ष अजिंक्य सावंत व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी १० डिसेंबरला खंडोबाचीवाडी ग्रामपंचायतीस अर्ज केला होता. खंडोबाचीवाडी हद्दीतील स्वमालकीच्या जमीनीवर दगडखाण व खडी क्रशर टाकण्यासाठी ना हरकत मिळावी, गावाला कुठलाही त्रास होणार नाही असे नमूद केले होते. अर्जानंतर ग्रामपंचायत हद्दीतील घुमटवस्ती, कन्हेरवाडी व खंडोबाचीवाडी गावठाण येथील सत्तर ग्रामस्थांनी खडी क्रशरच्या विरोधातील अर्ज ग्रामपंचायतला दिला. खाण व क्रशरमुळे ध्वनी व वायू प्रदूषण यामुळे नागरिक व जनावरांना त्रास होईल. धुळीने शेतीव्यवस्था आणि वनविभागातील वृक्षांवर प्रतिकूल परिणाम होईल, अशी भीती व्यक्त केली. त्यामुळे सरपंच संतोष धायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात विशेष ग्रामसभेचे आयोजन केले होते. विरोध करण्यासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामसेविका सीमा गावडे यांनी अहवालवाचन केले. सावंत यांचा मागणी मांडण्यात आला. ज्या गटात खडी क्रशर होणार आहे. त्या गटातील शेतकऱ्यांनीही याला कडाडून विरोध केला आहे. डॉ. वसंत दगडे यांनी त्या ठिकाणी हॉस्पिटल उभारण्याचा अर्ज दिला. सर्व गोष्टींचा उहापोह झाल्यानंतर ग्रामस्थांनी एकमताने खडी क्रशरला 'ना हरकत देऊ नये' असा ठराव घेतला आहे. सोमेश्वर कारखान्याचे संचालक लक्ष्मण गोफणे यांनी सूचक तर संचालक शैलेश रासकर हे अनुमोदक आहेत.

# दिवे परिसरात पाणीटंचाईचे संकट; पुरंदर उपसा सिंचनाचे पाणी सोडण्याची मागणी

**पुरंदर । प्रतिनिधी**

दिवे परिसरात यावर्षी सुरुवातीला चांगला पाऊस झाला. मात्र, नंतरच्या काळात पावसाचे प्रमाण कमी होते. सध्या दिवे गावच्या बाजूच्या ओढ्यातील पाणीसाठा काही प्रमाणात टिकून आहे. मात्र, डोंगरालगत असणाऱ्या शेतकऱ्यांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे परिसरात पुरंदर उपसा सिंचन योजनेचे पाणी सोडण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.



चिंचावले, दरा भागात अंजीर लागवड मोठ्या प्रमाणात आहे. अंजिराचा खट्टा हंगाम संपला असून, मिठ्ठा हंगाम सुरू झाला आहे. परंतु अंजीर उत्पादकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणीटंचाईमुळे अंजीर फळांची गळती होत आहे. या परिसरात शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायात काहिशी वाढ होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत हिरव्या चाऱ्याची टंचाई जाणवत आहे. त्यामुळे दुग्ध व्यावसायिक हवालदिल झाले आहेत. विहिरींनी तळ गाठल्याने पाण्याची टंचाई जाणवत आहे. पाणीच नाही, तर चालू पिकांना पाणी द्यायचे कुठून, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. पुरंदर उपसा जलसिंचन योजनेचे पाणी या भागात सोडावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. आम्ही अगोदर पैसे भरण्यास तयार असून, आम्हाला पुरंदर उपसा जलसिंचन योजनेचे पाणी सोडावे, अशी आर्त हाक शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिली आहे.

# आनोसेवाडीत ट्रान्सफॉर्मर फोडून तांब्याच्या तारांची चोरी

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरुर तालुक्यातील कळवंतवाडी (आनोसेवाडी) परिसरात अज्ञात चोरट्यांनी शेतात बसवलेले रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) फोडून त्यातील तांब्याच्या तारांची चोरी केली आहे. या प्रकारामुळे परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. याप्रकरणी महावितरणचे तंत्रज्ञ लकीचंद मोरसिंग राठोड (वय २७, रा. रांजणगाव गणपती) यांनी शिरुर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार (दि. ९ जानेवारी) सायंकाळी ६ ते शनिवार (दि. १० जानेवारी) सकाळी ९ च्या दरम्यान ही चोरी झाली. कळवंतवाडी, आनोसेवाडी येथील शेतगट क्रमांक ८५९ मध्ये १००/२२ के.व्ही.ए. क्षमतेचे रोहीत्र बसवण्यात आले होते. चोरट्यांनी या रोहित्राची लोखंडी प्लेट तोडून त्यातील ऑईल खाली सांडवून दिले आणि आतील सुमारे ४० किलो वजनाच्या तांब्याच्या तारा चोरून नेल्या. या तारांची अंदाजे किंमत २४ हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. तांब्याच्या तारांच्या चोरीमुळे रोहित्राचे मोठे



तांत्रिक नुकसान झाले असून संपूर्ण भागाचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. शिरुर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ट्रान्सफॉर्मर फोडण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे, ज्यामुळे महावितरणच्या यंत्रणेवर आणि सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या चोरीप्रकरणी रविवार (दि. ११) रोजी अज्ञात चोरट्यांविरुद्ध शिरुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक फौजदार भोते या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा आणि परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.